POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२५८ ● मुंबई, मंगळवार, २१ एप्रिल २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## गोरेगाव नेस्को सेंटर ड्रग्जप्रकरणी आरोपींच्या कोठडीत वाढ

गोरेगाव येथील नेस्को सेंटरमधील ड्रग्जप्रकरणी चार आरोपींच्या पोलीस कोठडीत सोमवारी (20 एप्रिल) 4 दिवसांची वाढ करण्यात आली आहे. त्यात आनंद लक्ष्मण पटेल, विनित सुनिल गेरेलानी, शुभ रामलखन अग्रवाल आणि आयुष विकी साहित्य यांचा समावेश आहे. पोलीस कोठडीची मुदत संपत असल्याने या चौघांनाही पोलीस बंदोबस्तात बोरिवलीतील न्यायालयात हजर करण्यात आले होते. या चौघांच्या बँक खात्याची तपासणी करण्यात आली असून ड्रग्ज खरेदी-विक्रीचे काही व्यवहार झाल्याचे उघडकीस आले आहे. गोरेगाव येथील नेस्को सेंटरमध्ये एका लाईव्ह कॉन्सर्टमध्ये मद्यासह ड्रग्जचे सेवन केल्यानंतर 2 एमबीए विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला होता तर एका तरुणीवर उपचार सुरु आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल होताच पोलिसांनी आतापर्यंत 10 आरोपींना अटक केली आहे. त्यापैकी 5 जणांना न्यायालयीन कोठडी तर इतर 5 जण पोलीस कोठडीत होते. त्यापैकी आनंद लक्ष्मण पटेल, विनित सुनिल गेरेलानी, शुभ रामलखन अग्रवाल आणि आयुष विकी साहित्य यांच्या पोलीस कोठडीची मुदत संपत असल्याने सोमवारी दुपारी त्यांना बोरिवलीतील स्थानिक न्यायालयात पोलीस बंदोबस्तात हजर करण्यात आले होते. यावेळी पोलिसांनी आरोपींच्या बँक खात्यातून ड्रग्ज खरेदीसाठी काही ऑनलाईन व्यवहार झाल्याचे सांगून तपासासाठी आणखीन काही दिवसांची विनंती केली होती. आरोपी एका बड्या ड्रग्ज तस्कराच्या संपर्कात होते. त्याच्या पत्नीच्या खात्यात काही ऑनलाईन व्यवहार झाले होते. या व्यवहाराची आरोपींची समोरासमोर चौकशी करणे गरजेचे आहे असे सांगितले होते. पोलिसांची ही बाजू मान्य करुन न्यायालयाने त्यांच्या पोलीस कोठडीत चार दिवसांची वाढ केली आहे. त्यामुळे या सर्वांना आता शुक्रवारी 24 एप्रिलला पुन्हा न्यायालयात हजर केले जाणार आहे.


## गोरेगाव प्रकरणानंतर बीकेसीमधील सर्कलोको कॉन्सर्ट रद्द

# पोलिसांनी या कारणाने परवानगी नाकारली

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स येथे रविवारी (19 एप्रिल) आयोजित करण्यात आलेला 'सर्कलोको' कॉन्सर्ट अगदी शेवटच्या क्षणी रद्द करण्यात आला. पोलिसांनी या कॉन्सर्टसाठी परवानगी देण्यास नकार दिला. त्यामुळे आयोजकांना कॉन्सर्ट सुरू होण्याच्या अवघ्या काही तास आधीच तो रद्द करावा लागला. या निर्णयामुळे हजारो संगीतप्रेमींकडून संताप व्यक्त करण्यात येत असून 'एक्स्' (पूर्वीचे ट्विटर) या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर युझर्स आपला राग उघडपणे व्यक्त करताना दिसत आहेत.

'सर्कलोको' कॉन्सर्टमध्ये सुप्रसिद्ध डीजे 'मार्को कॅरोला' सहभागी होणार होता. त्यामुळे त्याच्या उपस्थितीमुळे तरुणाईमध्ये प्रचंड उत्साह होता. रविवारी दुपारी 2 ते रात्री 10 या वेळेत चालणाऱ्या कॉन्सर्टची 4 हजारांहून अधिक तिकिटे आधीच विकली गेली होती. त्यामुळे या कॉन्सर्टसाठी प्रचंड गर्दी जमण्याची अपेक्षा होती. त्यामुळे पोलिसांनी गर्दीचे व्यवस्थापन आणि कायदा व सुव्यवस्था राखण्याबाबत चिंता व्यक्त करताना परवानगी नाकारली होती. मात्र खरं कारण हे आहे की,





अलिकडेच गोरेगाव येथील एका कॉन्सर्टमध्ये घडलेली घटना आणि काही जणांचा जीव गेल्यानंतर पोलीस आता अधिकच सतर्क झाले आहेत. महत्त्वाचे म्हणजे अशा मोठ्या कॉन्सर्टमध्ये अमली पदार्थांचे सेवन आणि पुरवठा होण्याचा सतत धोका असतो. त्यामुळे पोलीस या सर्व घटनांवर लक्ष ठेवून आहेत.

पोलिसांच्या मते, यापूर्वी अशा कॉन्सर्टमध्ये किरकोळ चोऱ्या रोखण्यावर लक्ष केंद्रित करणे त्यांचे प्रामुख्याने काम असायचे. परंतु आता नवीन निर्देश आल्यामुळे केवळ अमली पदार्थ आणि इतर बेकायदेशीर कृत्यांवर लक्ष ठेवण्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. परिणामी, अशा कॉन्सर्टला परवानगी देताना आता अधिक कडक भूमिका स्वीकारली जात आहे. पोलिसांनी हे देखील नमूद केले की, जरी आयोजक अनेक महिन्यांपासून या कॉन्सर्टची तयारी करत होते, तरी त्यांनी 10 एप्रिलपर्यंत परवानगीसाठी औपचारिक अर्ज केला नव्हता. त्यानंतर, पोलिसांनी तीन स्वतंत्र नोटिसा काढून आयोजकांना आवश्यक परवानग्यांशिवाय कार्यक्रम पुढे न नेण्याबाबत ताकीद दिली होती. या इशाऱ्यांनंतरही, 19 एप्रिल रोजी आयोजकांनी सुमारे 6 हजार लोकांच्या गर्दीसह कार्यक्रम आयोजित करण्याची परवानगी मागितली होती. मात्र ही विनंती स्पष्टपणे नाकारण्यात आली.

पोलिसांच्या या कडक अंमलबजावणी धोरणाच्या अनुषंगानेच, शनिवारी जुहू येथे गायक-अभिनेता 'परेश पाहुजा' यांचा नियोजित असलेला कॉन्सर्टही परवानगीअभावी रद्द करण्यात आला होता. कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा टाळण्यासाठी, नवीन नियमांनुसारच ही पावले उचलली जात असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, कॉन्सर्ट रद्द झाल्यामुळे निराश झालेल्या अनेक चाहत्यांनी 'एक्स्' वर जाऊन आपली नाराजी व्यक्त केली. अंमली पदार्थांशी संबंधित बाबींमध्ये कडकपणा असणे आवश्यक असले, तरीही त्यासाठी संपूर्ण शहरातील संगीतप्रेमींना शिक्षा देणे हे अन्यायकारक आहे, असे त्यांनी म्हटले.

## देशात एमएमएस व्हिडिओचा पूर, ऑफिस ते बेडरुमपर्यंतची सारी गुपितं उलगडली

# कोण आणतं व्हिडिओ बाहेर?



■मुंबई। प्रतिनिधी,

देशात मोठ्या प्रमाणात एमएमएस व्हिडिओ लीक होऊ लागल्या आहेत. ऑफिस ते बेडरूममध्ये घडणारं अश्लील कांड आता जगाच्या समोर येऊ लागलं आहे. लीक झालेले एमएमएस व्हिडिओ केवळ ऑफिस आणि बेडपुरते मर्यादित नसून, त्यांची पोहोच कॉलेज आणि आता तर मेट्रोपर्यंत गेली आहे. नुकत्याच 19 मिनिटांचा तो व्हिडिओ व्हायरल झाला होता. सुरक्षा यंत्रणा आणि सायबर तज्ज्ञ देखील गोंधळात पडले आहेत.

### एआयचा वापर करून बनवले जातात व्हिडिओ

संबंधित व्हिडिओ पाहिल्यानंतर, तो खरा कृत्रिम व्हिडिओ एआयचा वापर करून बनवला आहे, हे सामान्य माणसाला ओळखणे अशक्य होते. या व्हिडिओचे रहस्य उलगडण्यापूर्वी 'सीझन 5' आणि '50 मिनिट फुल व्हर्जन'ने सायबर तज्ज्ञांसमोर एक नवीन आव्हान उभे राहिले आहे.

दरम्यान, अक चा वापर करून व्हिडिओंच्या माध्यमातून लोकांच्या जिज्ञासेचा गैरफायदा घेतल्याचं सांगण्यात येतंय. या व्हिडिओतून लोकांच्या मोबाईल फोनवर मालवेअर लिंक्स पाठवल्या जाताहेत. हजारो लोकांचे फोन हॅक झाले आणि त्यांची बँक खाती रिकामी करण्यात आली. नमो भारत रेल्वे सीसीटीव्ही फुटेजच्या लीकमुळे सरकारी पाळतीवरती प्रश्नचिन्ह उपस्थित राहते.

### बहुतेक लीक्स एआयच्या माध्यमातून तयार

या घोटाळ्यामधील धक्कादायक बाब अशी की, बहुतेक लीक्स एआयच्या माध्यमातून तयार करण्यात आले होते. जवळच्या लोकांनी व्हिडिओ लिक्स केले. सुरक्षारक्षकही घटनास्थळी सामित होते. एका कर्मचाऱ्याने नमो भारत रेल्वेचा एक सीसीटीव्ही व्हिडिओ आपल्या मोबाईलवर रेकॉर्ड करत प्रसारित केला. सायबर क्राइम करणाऱ्यांनी ललिता आणि सारा बलोच यांच्या नावाने लिक्स तयार करून लोकांची फसवणूक केली.

## 'राष्ट्रीय महिला आयोग आपल्या दारी' उपक्रमांतर्गत २१ एप्रिल रोजी नवी मुंबई येथे महिला जनसुनावणी




■ठाणे। प्रतिनिधी,

'राष्ट्रीय महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत महिला तक्रारींचे त्वरित निवारण करण्यासाठी दि. २१ एप्रिल २०२६ रोजी नवी मुंबई येथे महिला जनसुनावणीचे आयोजन करण्यात आले आहे. या जनसुनावणीस राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा मा. श्रीमती विजया रहाटकर अध्यक्षस्थानी राहणार आहेत.

राष्ट्रीय महिला आयोगाच्या नियोजनानुसार दि. २० एप्रिल २०२६ रोजी मुंबई येथे पोलीस महासंचालक (DGP) व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करण्यात येणार आहे. तसेच दि. २१ एप्रिल २०२६ रोजी 'राष्ट्रीय महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत महिला जनसुनावणी आयोजित करण्यात येणार असून, या जनसुनावणीमध्ये महिलांच्या प्रलंबित तक्रारी तसेच प्रत्यक्ष (Walk-in) तक्रारींची सुनावणी करण्यात येणार आहे.

सदर जनसुनावणी नवी मुंबई येथील सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, ९ वा मजला येथे आयोजित करण्यात येणार असून, सकाळी १०.०० वाजल्यापासून प्राथमिक सुनावणी आणि दुपारी १२.०० वाजता मुख्य सुनावणी करण्यात येणार आहे. जिल्हास्तरावरील विविध अधिकारी, पोलीस अधिकारी, समाजकल्याण विभाग, महिला व बाल विकास विभाग तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण (DLSA) यांचे प्रतिनिधी या सुनावणीस उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा प्रशासनाने आवश्यक त्या सर्व तयारीचे नियोजन केले असून, महिला तक्रारदारांनी या संधीचा लाभ घेऊन आपल्या समस्या मांडाव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी, ठाणे यांनी केले आहे.

## टिटवाळ्यात ड्रग्ज रॅकेटचा पदाफाश, पोलिसांनी कसा काढला ड्रग्ज पेडलरचा माग

■टिटवाळा। प्रतिनिधी,

नेस्को ड्रग्ज पार्टी प्रकरणानंतर ड्रग्ज विरूद्ध पोलिसांनी धडक कारवाई सुरू केली आहे. अंमली पदार्थविरोधी विभागाने साकीनाक्यातून जप्त केलेल्या दोनशे एक्स्टेंसी गोळ्यांचे टिटवाळा कनेक्शन उघड झालं आहे. आणि त्यानंतर पोलिसांनी टिटवाळ्यात एका सोसायटीतील फ्लॅटवर छापा टाकत धडक कारवाई केली आहे. टिटवाळ्यातील एका फ्लॅटमध्ये एक महिला ड्रग्जचा हा काळा धंदा करत होती. या महिलेच्या पोलिसांनी मुसक्या आवळले आहेत.

गोरेगावच्या नेस्को ड्रग्ज पार्टी प्रकरणानंतर ड्रग्ज विरोधात पोलिसांनी धडक कारवाई सुरू केली आहे. अंमली पदार्थविरोधी विभागाने साकीनाक्यातून जप्त केलेल्या दोनशे एक्स्टेंसी गोळ्यांचे टिटवाळा कनेक्शन उघड झालं.

### मुंबईच्या ड्रग्ज क्वीनचा कसा झाला गेम ओव्हर?

**कोण आहे ती ड्रग्ज पेडलर?**



टिटवाळ्यातून अटक केलेली पॉल पूर्वी डान्सबारमध्ये काम करायची. डान्सबारची नोकरी सोडल्यानंतर ती ड्रग्ज सप्लायर बनली आहे. ड्रग्ज सप्लायर पॉलची दोन लग्न केले आहेत. एक नवरा गुन्हेगार असून त्याचाही पोलिसांकडून शोध सुरू आहे. नेस्कोमध्ये ड्रग्जच्या सेवनानंतर दोन तरुणांचा मृत्यू झाला होता. आणि त्यामुळे मुंबईत एकच खळबळ उडाली होती..त्यानंतर मात्र पोलिसांनी ड्रग्ज पेडलरचा माग काढत मुसक्या आवळायला सुरुवात केली.. आधी साकीनाक्यातून इरफान अन्सारी आणि त्यानंतर टिटवाळ्यातून पॉल नावाच्या महिला ड्रग्ज पेडलरला अटक केलीय.. आता या पॉलच्या चौकशीत मोठं ड्रग्जचं रॅकेट समोर येण्याची शक्यता वर्तवण्यात येते आहे.

आणि पोलिसांनी कारवाईची व्याप्ती वाढवली. टिटवाळा- गोवेली रोडवर असणाऱ्या हायप्रोफाइल सोसायटीतील एका फ्लॅटवर पोलिसांनी छापा टाकला आहे. या फ्लॅटमधून पोलिसांनी तब्बल 6 कोटींच्या 5 हजार एक्स्टेंसी गोळ्या जप्त करून या महिलेला अटक केली आहे. ए पॉल असं या महिलेचं नाव आहे.

टिटवाळ्यात ड्रग्ज रॅकेटचा पदार्फाश आहे. पोलिसांनी कसा काढला ड्रग्ज पेडलरचा माग,जाणून घ्या. नेस्कोमधील पार्टीत ड्रग्ज प्रकरण समोर आला आहे. दुसऱ्या दिवशी अमली पदार्थ विरोधी पथकाचा साकीनाका इथं छापा पडला आहे. छाप्यात 200 एक्स्टेंसी गोळ्या जप्त केल्या आहेत. एक्स्टेंसी गोळ्या बाळगणारा इरफान अन्सारी अटकेत आहे. इरफान अन्सारीच्या चौकशी पॉल या महिलेचं नाव समोर आहे. पॉल आधी कल्याणमध्ये राहात होती. सहा महिन्यांपूर्वीच ती टिटवाळा इथं शिफ्ट झाली. पोलिसांनी टिटवाळ्यात पॉलच्या फ्लॅटवर छापा टाकला आहे. पॉलच्या घरातून तब्बल 6 कोटींच्या 5 हजार एक्स्टेंसी गोळ्या जप्त केल्या आहेत. ड्रग्ज पेडलर पॉलला अटक केलं आहे.

पोलिसांनी टिटवाळ्यामधून पॉलला अटक केल्यानंतर आता ड्रग्जच्या काळ्या धंद्याची पाळंमुळं उकरून काढायला सुरूवात केलीय. पॉला अटक केल्यानंतर पोलिसांनी तिची कुडंलीच मांडली आहे.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये अमली पदार्थांच्या तस्करीवर मोठा प्रहार

# २६ लाखांचा गांजा जप्त, एकाला अटक

**आंध्र प्रदेश कनेक्शन आणि पुढील तपास**

प्राथमिक तपासात हा गांजा आंध्र प्रदेशातून तस्करी करून आणल्याचे समोर आले आहे. हा साठा कोठून आणला, यात आणखी कोणाचे हात गुंतले आहेत आणि शहरात हा गांजा कोणाला विकला जाणार होता, याचा तपास आता पोलीस करत आहेत. ही कारवाई सिडको एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या विशेष पथकाने यशस्वी केली असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास लहाने या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.



■पुणे। प्रतिनिधी,

छत्रपती संभाजीनगर शहरातील सिडको एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या विशेष पथकाने अमली पदार्थ तस्करीविरोधात धडक कारवाई करत आंध्र प्रदेशातून विक्रीसाठी आणलेला मोठा गांजाचा साठा जप्त केला आहे. या कारवाईत पोलिसांनी एका आरोपीला बेड्या ठोकल्या असून, त्याच्याकडून सुमारे ३१ लाख ७२ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

### गुप्त माहितीच्या आधारे सापळा

पोलिसांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, नारेगाव परिसरातील छत्रपती नगर, काकडे संकुल भागात गांजाची मोठी खेप येणार आहे. या माहितीची खातरजमा करून पोलिसांनी या परिसरात सापळा रचला. यावेळी संशयास्पदरीत्या आढळलेल्या एका पांढऱ्या रंगाच्या चारचाकी वाहनाची झडती घेतली असता, पोलिसांना त्यामध्ये गांजाचा साठा मिळून आला.

### ३१ लाखांहून अधिकचा मुद्देमाल जप्त

या कारवाईत पोलिसांनी विदेश सुरेश माचरे (वय ३८ वर्षे, व्यवसाय-चालक) याला ताब्यात घेतले आहे. त्याच्या वाहनातून पोलिसांनी तब्बल ५३ किलो ४४१ ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला.या गांजाची किंमत सुमारे २६ लाख ७२ हजार ५० रुपये असून एकूण मुद्देमाल वाहन आणि गांजा मिळून ३१ लाख ७२ हजार ५० रुपये.

## महाराष्ट्रातील प्रसिद्ध त्र्यंबकेश्वर मंदिरात मोठा 'वीआयपी' घोटाळा!

■नाशिक। प्रतिनिधी,

कोट्यवधी भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या त्र्यंबकेश्वर मंदिरात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची आर्थिक लूट करणाऱ्या एका मोठ्या रॅकेटचा पदार्फाश झाला आहे. नाशिकच्या त्र्यंबकेश्वर मंदिरातील व्हीआयपी दर्शन घोटाळ्यात आरोपीनं कोट्यवधीची माया गोळा केल्याचा पोलिसांचा संशय आहे. आरोपी पुरुषोत्तम कडलगच्या खात्यात कोट्यवधी रुपये जमा असल्याची माहिती आहे. हा सगळा पैसा व्हीआयपी दर्शनातूनच कमावल्याचा पोलिसांचा अंदाज आहे.

त्र्यंबकेश्वर मंदिर... बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक मंदिर.... जिथे दर्शनासाठी भाविक तासनतास रांगेत उभे राहतात. मात्र, याच रांगेत उभे राहणाऱ्या निष्पाप भाविकांची "व्हीआयपी दर्शना"च्या नावाखाली लूट करत विश्वस्ताने एक कोटी 13 लाख रुपये कमावले असल्याची खळबळजनक माहिती समोर आली. हे रॅकेट इतके

### थेट भक्तांनाच लुबाडले



पद्धतशीर होते की, मध्यस्थ भाविकांना काही हजार रुपये घेऊन व्हिआयपी रांगेतून बाहेर काढून थेट गाभाऱ्यापर्यंत नेत असत. विशेष म्हणजे दर्शन झाल्यावर मध्यस्थ व्यक्ती यूपीआयद्वारे सर्व पेमेंट स्वीकारत होता. त्यातील काही भाग हा मध्यस्थला तर, 84 टक्के कमिशन या प्रकरणी पुरुषोत्तम कडलग याला मिळत असल्याची माहिती आहे. पुरुषोत्तम यांच्या सख्ख्या भावाचा मुलगा अभिषेक हा सर्व व्यवहार सांभाळत असे. आता विश्वस्त असलेल्या कडलगला न्यायालयाने पुन्हा चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

रक्कळ काही महत्वाच्या मुद्यांभोवती तपास करणार आहे. अधिकृत पावती नसताना भाविकांना कोणत्या दरवाजातून प्रवेश मिळाला? या घोटाळ्यात मंदिर प्रशासनातील अन्य कर्मचारी सामील आहेत का? हे रॅकेट नेमके किती वर्षांपासून सुरू आहे? उकळलेली कोट्यवधीची रक्कम कुठे गुंतवली गेली? या मंदिरावर स्वतः न्यायाधीश अध्यक्षस्थानी असल्याने आता विश्वस्त पुरुषोत्तम कडलग यांच्या विश्वस्त पदाचा निलंबन केले जाऊ शकते. नाशिक जिल्हा मुख्य न्यायाधीश यांनी या सर्व तक्रारींची गंभीर दखल घेतली आहे. मात्र, भाविक तक्रार देण्यासाठी पुढे येत नसल्याने कायदेशीर पेच निर्माण होण्याची शक्यता आहे.ज्या भाविकांची अशी फसवणूक झाली आहे त्यांनी भीती न बाळगता तक्रार देण्यासाठी पुढे येण्याची गरज आहे.या चौकशीतून मंदिरातील भ्रष्टाचाराची किती मोठी पाळेमुळे खोदून निघतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

## चार वाहनांना धडक देऊन ट्रक कोसळला विहिरीत



■रत्नागिरी। प्रतिनिधी,

मुंबई-गोवा महामार्गावर आज पहाटे हातखंबा येथे चार वाहनांचा भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत एक जण गंभीर जखमी झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, लोखंडी शिगांनी भरलेला ट्रक, आयशर टेम्पो, आंबा वाहतूक करणारी बोलेरो आणि एक कार अशी चार वाहने एकमेकांवर आदळली. अपघाताची तीव्रता मोठी असल्याने वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. चार वाहनांना धडक देऊन महामार्गाजवळ विहिरीत कोसळला.

या अपघातात ट्रकमधील क्लिनर गंभीर जखमी झाला असून त्याला तातडीने रत्नागिरी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्याची प्रकृती चिंताजनक आहे. घटनेची माहिती मिळताच रत्नागिरी ग्रामीण पोलिस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. बचावकार्य सुरू असून अडकलेल्या जखमींना बाहेर काढण्याचे प्रयत्न करण्यात आले. काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.



## मनमाडमध्ये मनोरुग्णाचा हाय व्होल्टेज ड्रामा... ओव्हरहेड वायरच्या खांबावर चढल्याने रेल्वे सेवा विस्कळीत

■नाशिक। प्रतिनिधी,

मुंबई : नाशिक जिल्ह्यातील मनमाड रेल्वे स्थानकावर एका मनोरुग्ण व्यक्तीने ओव्हरहेड वायरच्या खांबावर (गॅन्ट्री) चढून गोंधळ घातल्याची खळबळजनक घटना शुक्रवारी (दि. १७) दुपारी घडली. या व्यक्तीने उच्च दाबाच्या ओव्हरहेड वायरला लटकण्याचा प्रयत्न केल्याने रेल्वे प्रशासनाला तत्काळ वीजपुरवठा खंडित करावा लागला. या हाय व्होल्टेज ड्रामामुळे स्थानकावर मोठी खळबळ उडाली असून काही काळ रेल्वे सेवाही विस्कळीत झाली होती.

दुपारी ३ च्या सुमारास साधारण ३० वर्षे वयोगटातील एका व्यक्तीने अचानक फलाटाच्या छतावर आणि त्यानंतर गॅन्ट्रीवर चढून गोंधळ घालण्यास सुरुवात केली. या घटनेचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित झाला असून, त्यामध्ये हा अर्धवट कपड्यांमधील तरुण गॅन्ट्रीवरून धोकादायक पद्धतीने लटकताना दिसत आहे. त्याला खाली उतरवण्यासाठी रेल्वे कर्मचारी आणि प्रवाशांनी धावपळ केली. पाच ते सहा जण त्याला पकडण्यासाठी मागे धावत असताना फलाटावर बघ्यांची मोठी गर्दी जमली होती.

मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी स्वप्नील निला यांनी दिलेल्या माहितीनुसार, या घटनेनंतर खबरदारीचा उपाय म्हणून ओव्हरहेड वायरचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता. या काळात काही गाड्या इतर फलाटांवरून वळवण्यात आल्या. सुमारे ४० मिनिटांच्या थरारानंतर या व्यक्तीला सुरक्षितपणे खाली उतरवण्यात यश आले. या प्रकारामुळे रेल्वे वाहतुकीवर थोडा वेळ परिणाम झाला असला तरी, आता परिस्थिती नियंत्रणात असल्याचे रेल्वे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.



संपादकीय


संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# आरक्षणापासून सुरक्षेपर्यंत!



भारतासारख्या लोकशाहीप्रधान देशात सर्व घटकांना समान प्रतिनिधित्व मिळणे, म्हणजे लोकशाहीचा मान राखणे! भारतातील महिलांची लोकसंख्या देशाच्या एकूण लोकसंख्येच्या जवळपास निम्मी असली, तरी त्यांच्या राजकीय सहभागाचे प्रमाण दीर्घकाळ अत्यल्प राहिले आहे. या पार्श्वभूमीवर वर्ष २०२३ मध्ये संमत झालेले 'नारी शक्ती वंदन', हे १२३ वे सुधारणा विधेयक भारतीय राजकारणात महिलांच्या सशक्तीकरणासाठी एक ऐतिहासिक पाऊल मानले जात आहे. या विधेयकाद्वारे लोकसभा आणि राज्य विधानसभा यांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के जागा आरक्षित करण्याचे प्रावधान (तरतूद) करण्यात आले आहे. सध्या संसदेत महिलांचे प्रमाण १५ टक्क्यांपेक्षा अल्प आहे. या कायद्यामुळे महिला लोकप्रतिनिधींची संख्या थेट १८१ वर पोचू शकते. या विधेयकाचा महत्त्वाचा उद्देश म्हणजे महिलांचे राजकीय प्रतिनिधित्व वाढवणे. आरक्षणाच्या माध्यमातून महिलांना निर्णयप्रक्रियेत थेट सहभागाची संधी मिळेल, पर्यायाने महिलांचे सक्षमीकरण होईल. राजकीय क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढल्यास त्यांच्या नेतृत्व कौशल्य विकसनासह त्यांच्या आवश्यकता म्हणजेच 'शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आणि सुरक्षा यांच्या निर्णयप्रक्रियेत त्यांना महत्त्वाचे स्थान मिळेल. महिलांना देशाची दिशा ठरवण्याचे अधिकार देणारे हे माध्यम आहे', असे म्हटले जात आहे. तथापि या विधेयकाच्या कार्यवाहीशी जोडलेली महत्त्वाची अट म्हणजे मतदारसंघ पुनर्रचनेनंतर ते लागू होणार आहे. या कायद्यानुसार महिलांसाठीचे ३३ टक्के आरक्षण तात्काळ लागू होणार नसून, ते पुढील जनगणना आणि त्यानंतर होर्णाया मतदारसंघांच्या पुनर्रचनेनंतर म्हणजेच वर्ष २०२९ मध्ये होर्णाया निवडणुकीच्या वेळी कार्यान्वित होणार आहे. मतदारसंघ पुनर्रचना म्हणजे लोकसंख्येच्या ताज्या आकडेवारीनुसार लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांच्या सीमा अन् जागा यांचे पुनर्वाटप करणे होय. यालाच विरोधी पक्षांनी मोठा विरोध केला आहे. हा विरोध करतांना त्यांनी जातीनिहाय आरक्षणाच्या सूत्राला सोडलेले नाही, तसेच आवर्जून उत्तर आणि दक्षिण भारताला विभाजित करत ते राजकारणाचे सूत्र बनवले. विरोधकांना सत्ता मिळवण्यासाठी विभाजनाचे, आक्षेपाचे, दिशाभूल करण्याचे कोणतेही सूत्र संधी मिळताच पुरेसे असते. त्यामुळे महिला आरक्षणाच्या समवेत आलेल्या सीमांकनाला त्यांचा विरोध ओघाने येणारच, यात शंका नाही. प्राचीन भारतीय परंपरा ते आधुनिक काळातही कर्तृत्ववान महिलांची संख्या पुष्कळ मोठी आहे. सध्याच्या काळातही भारतीय महिलांनी आरक्षणाविनाही मोठ्या यशाला गवसणी घातली आहे, म्हणजेच महिलांमध्ये ती गुणवत्ता आहेच, हे निःसंशय! तरीही नारी शक्ती विधेयकाच्या संदर्भात एक धोका ठरतो, तो नामदेखल्या अधिकाराचा! म्हणजे निवडून येणारी महिला असते; परंतु प्रत्यक्ष सत्ता तिचा पती किंवा पुरुष नातेवाईक यांच्या हातात असते. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये याची अनेक उदाहरणे पहायला मिळतात. शिक्षणाचा अभाव आणि आर्थिक अवलंबित्व यांमुळे काही महिला स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात मागे रहातात. जिथे अशी परिस्थिती असते, तिथे महिलांचे सबलीकरण केवळ स्वाक्षरीपुरते मर्यादित रहाते. त्यामुळे आरक्षणामुळे सबलीकरणाचा खरा उद्देश साध्य होण्यासाठी महिलांना प्रशिक्षण, शिक्षण आणि सामाजिक पाठबळ आवश्यक ठरते. आरक्षणाची संमती ते कार्यवाही यांतील कालावधी पुष्कळ मोठा आहे. त्याचा उपयोग यासाठी निश्चितपणे करता येऊ शकतो. या सबलीकरणाच्या चर्चेत आणखी एक महत्त्वाचे सूत्र पुढे येते, ते म्हणजे महिलांची सुरक्षा! 'राजकीय आरक्षण देऊन महिलांचे खरे सक्षमीकरण साध्य होईल का?', हा प्रश्न सद्यःस्थितीत उपस्थित रहाणारा आहेच; कारण महिलांच्या संरक्षणासाठीच्या कायद्यांची प्रभावी आणि कठोर कार्यवाही आजपावेतो क्वचितच योग्यरित्या झालेली पहायला मिळते. त्यामुळे महिलांच्या आरक्षणापासून सुरक्षेपर्यंतचा विचार होणे अत्यावश्यक ठरते. ह्यआधुनिक भारतातील यशाची उंचच उंच शिखरे गाठतांना महिला किती कसरती करत असतात ?ह्न, हे सर्वांना ठाऊक असले, तरी अनेक क्षेत्रांत त्यांचा अभिमान, श्रद्धास्थाने, धर्म यांवरील आघात त्या सहन करत आहेत. नाशिकचा कॉर्पोरेट जिहाद, अमरावतीचे लैंगिक छळाचे मोठे प्रकरण, श्रद्धा वालकर प्रकरणाने स्पष्टपणे समोर आणलेला लव्ह जिहाद यांतून वेळोवेळी ते पहायला मिळाले आहे. आधुनिक काळात आणि देशात महिला सबलीकरणासाठी जोमाने प्रयत्न चालू असतांनाही सातत्याने समोर येत असलेली अत्याचारांची प्रकरणे, सबलीकरणाच्या वेगावर प्रश्नचिन्ह उभी करणारी ठरतात. याचे कारण म्हणजे या सबलीकरणाला नसलेली धर्माची जोड! धर्माच्या जोडीने अजरामर झालेल्या जिजाऊ, झाशीची राणी यांनी धर्म अंगीकारला होता; म्हणूनच महिला सबलीकरणाची उदाहरणे देतांना त्या नेहमी अग्रस्थानी येतात. इतर देशांपेक्षा भारत महिलांविषयी संवेदनशील असण्याला कारणच मुळी येथील प्राचीन हिंदु धर्मपरंपरा आहे, हेही लक्षात घ्यायला हवे. प्रत्येक १६ व्या मिनिटाला एका महिलेवर बलात्कार होत असतांना महिलांच्या सुरक्षेची पूर्तता आधी होणे आवश्यक ठरते. महिलांवर अत्याचार करण्यात पुढे असलेल्यांमध्ये धर्मांध मुसलमानांची, तसेच अनेक गुन्ह्यांमध्ये धर्मांध घुसखोरांची संख्या लक्षणीय आढळून येते. त्यामुळे प्रथम त्यांच्यापासून भारतीय महिलांचे संरक्षण होणे नितांत आवश्यक आहे. खरेतर आतापर्यंत समान नागरी कायदा आला असता, तर प्रत्येकाला अगदी मुसलमानांनाही एकपत्नीव्रत पालन करणे आवश्यक झाले असते. प्रत्येकाला सोयी-सुविधांवर समान अधिकार असता, मग अधिक मुले जन्माला घालणेही आपोआप बंद झाले असते. गुणवत्तेला प्राधान्य दिले गेले असते, तर आरक्षणाचा प्रश्नच उपस्थित झाला नसता. लोकसंख्येच्या विशेष सखोल पुनरावलोकन प्रक्रियेच्या पाठोपाठ घुसखोरांना हाकलून लावले गेले, तर जनगणनेत वास्तविक लोकसंख्या समोर येईल आणि महिलांचा नेमका आकडा समजू शकेल. त्यानंतर केलेले सीमांकन आणि महिला आरक्षण अधिक सयुक्तिक ठरू शकते. घुसखोरांना तसेच ठेवून जनगणना केल्यामुळे धर्मांधांसह त्यांच्या अनेक पत्नी आणि त्यांनी अत्यधिक मुले यांची संख्या ओघानेच मोठी ठरू शकते. त्या आधारे जर पुढे महिला आरक्षण आले, तर त्यात धर्मांध मुसलमान महिलांची संख्या मोठी असेल आणि त्यातून त्यांनी पुढे निवडून येऊन धर्मांधता पसरवली, तर भारतीय हिंदु महिलांपुढे कोणत्या समस्या निर्माण होऊ शकतात, याचा अंदाज नाशिकच्या कॉर्पोरेट जिहादच्या प्रकरणातून लावता येऊ शकतो. त्यामुळेच महिला सबलीकरणाच्याही आधी देशाचे म्हणजेच देशहिताचे सबलीकरण प्राधान्याने व्हावे, ही भारतीय महिलांची केंद्र सरकारकडून अपेक्षा आहे.

# मुलांचे करिअर आणि पालकांची परीक्षा




दहावी आणि बारावीच्या परीक्षा संपल्यानंतरचा काळ हा मुलांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. या काळात अनेकदा पालक मुलांवर पुढील शिक्षण किंवा करिअर निवडीबाबत दबाव टाकतात. मात्र, कितीही झाले तरी मुलांवर सक्ती करू नये. प्रत्येक मुलाची आवड, क्षमता आणि स्वप्ने वेगळी असतात, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. परीक्षा संपल्यानंतर काही काळ मुलांना मोकळा श्वास घेऊ द्यावा. मुलांना आपले करिअर निवडताना पालकांनी एक मार्गदर्शक म्हणून काम करायला हवे.

मुलांच्या जीवनात दहावी आणि बारावीच्या परीक्षा अतिशय महत्त्वाच्या असतात. याच परीक्षा मुलांना त्यांच्या पुढील शिक्षणाच्या दिशा ठरवून देतात. त्यासाठी आता मुलांच्या परीक्षा संपल्या असल्या तरी पालकांच्या परीक्षा सुरू झाल्या आहेत असे म्हणता येईल. मुलांचे करिअर घडविताना मुलांच्या आवडीनिवडी पालकांना जास्त माहीत असतात. त्यामुळे आपल्या मुलांच्या करिअरची दिशा ठरवू शकतात. याचा परिणाम मुलांचा व पालकांचा वेळ, पैसा व श्रम वाचण्याला मदत होते. तो वेळ, पैसा व श्रम यांचा इतर ठिकाणी वापर करू शकतात.

महत्त्वाची बाब म्हणजे, मुलांचे करिअर निवडताना पालकांना योग्य नियोजन करावे लागते. त्यासाठी दहावी आणि बारावीच्या परीक्षा मुलांच्या दृष्टिकोनातून महत्त्वाच्या असतात. तेव्हा मुलांचे करिअर निवडताना पालकांनी मुलांवर सक्ती करू नये. त्यांच्या सुद्धा आवडीनिवडीचा विचार करावा. तेव्हा पालकांनी मुलांना दिलेल्या अधिकाराचा गैरवापर मुलांनी सुद्धा करू नये. त्याचबरोबर मुलांनी आपला शिक्षणाचा पाया मजबूत करण्यासाठी पालक अथक प्रयत्न करीत असतात, हे विसरून चालणार नाही. त्यासाठी मुले आणि पालक यांच्यात वेळच्यावेळी अभ्यासाच्या संदर्भात चर्चा होणे गरजेची आहे. डॉक्टरला वाटते माझी मुले डॉक्टर व्हावीत, वकिलाला वाटते माझी मुले वकील व्हावीत, शिक्षकाला वाटते माझी मुले शिक्षक व्हावीत, मात्र माझे असे मत आहे, ज्या क्षेत्राची आवड मुलांना असेल त्या क्षेत्रात त्यांनी करिअर करावे. तशा रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. म्हणजे मुले आणि पालक यांच्यामध्ये विचारविनिमय होणे गरजेचे आहे. शक्यतो भविष्याच्या दृष्टीने एक वाक्यता हवी. बरीच मुले नंतर पालकांना दोष देतात. काही मुले पालकांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन त्यांना मदत करत अभ्यास करतात आणि आपल्या स्वतःच्या पायावर उभे राहून आपल्या आवडीनिवडी पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. यात अनेक मुलांना यश आले आहे.

पालकांनी आपल्या मुलांच्या करिअरचा विचार करत असताना एक मित्र आणि मार्गदर्शक म्हणून आपली भूमिका मुलांसमोर मांडावी. तेव्हाच मुलांच्या खऱ्या अर्थाने जीवनाला सुरुवात होत असते. यातच पालकांची खरी परीक्षा असते. काही पालक करिअर मार्गदर्शक केंद्रावर आपल्या मुलांना घेऊन जातात. यामुळे कोणकोणत्या नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत किंवा कोणत्या शाखेची निवड केल्यावर आपल्याला कोणत्या क्षेत्रात नोकऱ्या उपलब्ध होऊ शकतात याची पूर्वकल्पना मुलांना येते. त्यामुळे अभ्यासक्रम निवडणे सोपे जाते.

आता खऱ्या अर्थाने पालकांची परीक्षा सुरु झाल्याने आपल्या मुलांची आवडनिवड लक्षात घेऊन मुलांना त्यांचे करिअर निवडण्यासाठी मार्गदर्शन करावे. मात्र सक्ती करू नये. एखादा मार्ग कठीण वाटत असेल तर सोप्या भाषेत समजवून सांगा म्हणजे त्या क्षेत्रातील आवड निर्माण होऊन आपले करिअर करू शकतो. त्यासाठी योग्यवेळी करिअर मार्गदर्शनाची गरज असते. काही मुले आपल्या मित्राने जी शाखा निवडली त्यामुळे तो त्या शाखेकडे जातो, असे बऱ्याच मुलांचे चित्र आपल्याला पाहायला मिळते. करिअरच्या दृष्टीने मुलांना शाखा निवडणे, त्याविषयी मार्गदर्शन घेणे गरजेचे आहे. त्यामुळे मुलांच्या जीवनात हा महत्त्वपूर्ण निर्णय असतो. त्यासाठी सेवक तत्त्वावर होणारी भरती रद्द करून सरळ सेवा भरती करणे जास्त हिताचे ठरणार आहे. आज अनेक मध्यमवर्गीय कुटुंबांची परिस्थिती गृहीत धरल्यास घरात एक व्यक्ती कमावणारी असते आणि चार लोक खाणारे असतात. त्यात अधूनमधून नातेवाइकांचा सुद्धा समावेश असतो. वाढत्या महागाईचा विचार केल्यास कंत्राटी पद्धतीमुळे त्यांचा जीव टांगणीला आलेला असतो. त्यामुळे आताच्या मुलांना योग्य मार्गदर्शनाची गरज आहे. शासन स्तरावर देखील रोजगाराच्या वेगवेगळ्या नवीन संधी निर्माण करता आल्या पाहिजेत. असे असले तरी उन्हाळी सुट्टीत मजा करत असताना आतापासून आपली आवड लक्षात घेऊन करिअरचे नियोजन केले पाहिजे. जेणेकरून भविष्यात रोजगाराच्या संधी निर्माण होतील अशा क्षेत्राकडे वळावे. त्यासाठी विविध क्षेत्रांचा अभ्यास करावा लागेल. तसेच इयत्ता सातवी आणि आठवीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी करिअरच्या दृष्टीने विचारविनिमय करावा. म्हणजे दहावी आणि बारावीनंतर पुढे काय करता येईल याचे उत्तर अधिक सुलभरीत्या त्यांना मिळू शकते. आपण पाहिले तर बऱ्याच वेळा मुले परीक्षेच्या काळात तणावग्रस्त असलेले दिसतात. अभ्यास नीट न झाल्याने पास होऊ की नापास याची मुलांना अधिकच भीती असते. तसेच या तणावाखाली येऊन अनेक मुले आत्महत्या करण्याचा पर्याय निवडतात, आपल्याला परीक्षेत कमी गुण मिळाले तर पुढे काय करायचे? असे अनेक प्रश्न मुलांना सतावत असतात. त्यामुळे मुलांना तणाव निर्माण होतो. अशावेळी पालकांनी मुलांना धीर दिला पाहिजे. परीक्षा काळात मुलांच्या अभ्यासासाठी घरात शांतता हवी. तसेच त्याने एकाग्रतेने अभ्यास करायला हवा असे वातावरण निर्माण केले गेले पाहिजे. मुलांच्या आहाराकडे आणि त्यांच्या विश्रांतीकडे लक्ष द्यावे. दहावी आणि बारावीच्या परीक्षा संपल्यानंतरचा काळ हा मुलांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. या काळात अनेकदा पालक मुलांवर पुढील शिक्षण किंवा करिअर निवडीबाबत दबाव टाकतात. मात्र, कितीही झाले तरी मुलांवर सक्ती करू नये. प्रत्येक मुलाची आवड, क्षमता आणि स्वप्ने वेगळी असतात, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. परीक्षा संपल्यानंतर काही काळ मुलांना मोकळा श्वास घेऊ द्यावा. त्यानंतर शांतपणे आणि खुलेपणाने पालक व मुलांनी एकत्र बसून पुढील वाटचालीबाबत चर्चा करावी. मुलांची एकमेकांशी वारंवार तुलना करणे टाळावे.

मुलांना काय आवडते, त्यांची ताकद काय आहे, त्यांना कोणत्या क्षेत्रात करिअर करायचे आहे हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. पालकांची भूमिका केवळ निर्णय लादण्याची नसून योग्य मार्गदर्शन करण्याची असते. मुलांना आपले करिअर निवडताना पालकांनी एक मार्गदर्शक म्हणून काम करावे. मुलांना विविध पर्यायांची माहिती देणे, त्यांचे फायदे-तोटे समजावून सांगणे आणि त्यांच्या निर्णयाला पाठिंबा देणे हे अधिक गरजेचे आहे. मुलांचे करिअर हा त्यांच्या आयुष्याचा दीर्घ प्रवास आहे. त्या प्रवासात योग्य दिशा दाखवणे, त्यांना आत्मविश्वास देणे आणि त्यांच्या निवडीचा आदर करणे हीच पालकांची खरी परीक्षा आहे.

# बिल्डर तुपाशी, रहिवासी उपाशी

साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या अक्षय तृतीयेला घर खरेदी किंवा मालमत्तेत गुंतवणूक करण्याला अनेकजण प्राधान्य देतात. अक्षय तृतीया दोन दिवसांवर आलेली असताना राज्य सरकारने सरकारी अधिकारी आणि कर्मचार्यांसाठी प्रशस्त घरे बांधण्याची घोषणा करत खूशखबर दिली आहे. या घोषणेनुसार सरकारी अधिकारी-कर्मचार्यांना आता आधुनिक, सुसज्ज आणि प्रशस्त घरे मिळणार आहेत. आतापर्यंत विविध वेतनगटातील अधिकारी-कर्मचार्यांना 34 चौ.मी.पासून ते 180 चौ.मी.ची घरे उपलब्ध करून दिली जात होती. आता नव्याने बांधण्यात येर्णाया सरकारी घरांमध्ये उच्च वेतनगटातील अधिकार्यांसाठी 240 चौ.मी.पर्यंत तर निम्न वेतनगटासाठी 45 चौ.मी.पर्यंत क्षेत्रफळ निश्चित करण्यात आले आहे. म्हणजेच नव्या बांधकामामध्ये अधिकारी आणि कर्मचार्यांना 485 चौ. फुटापासून ते 2580 चौ. फुटांपर्यंतची घरे मिळणार आहेत. हे शक्य झाले आहे ते सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी घेतलेल्या एका निर्णयामुळे. राज्यातील शासकीय अधिकारी आणि कर्मचार्यांसाठी बांधण्यात येर्णाया शासकीय निवासस्थानांच्या चटई क्षेत्रफळात सुधारणा करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी घेतला. सार्वजनिक बांधकाम विभागाने गुरुवारी यासंदभार्तील शासन निर्णय जारी केला. या निर्णयात सातव्या वेतन आयोगानुसार विविध वेतनगटांप्रमाणे निवासस्थानांचे चटई क्षेत्रफळ नव्याने निश्चित करण्यात आले आहे. ज्यात टाईप-अ ते टाईप-जी पर्यंत विविध प्रकारच्या सेवा निवासस्थानांचा समावेश आहे. यामुळे सरकारी अधिकारी-कर्मचार्यांना वन बीएचके, टू बीएचकेपासून थ्री बीएचकेपर्यंतची अधिक प्रशस्त आणि दर्जेदार घरे मिळणार आहेत. आजच्या घडीला मुंबई ही मेट्रोसिटी मानली जात असली, तरी या वेगवान शहरात राहर्णाया मुंबईकरांच्या जीवनमानाचा दर्जा अत्यंत सुमार आहे. मुंबईच काय राज्यातील बहुतेक शहरांची हीच अवस्था आहे. या शहरांतील एक मोठा वर्ग गेल्या कित्येक वर्षांपासून झोपडपट्ट्या, जुन्या चाळी, मोडकळीला आलेल्या इमारतींमधील लहान आकाराच्या घरांमध्येच रहात आहे. एकाच घरात अनेक पिढ्या वाढल्या, अनेकांची कुटुंब-परिवार विस्तारले, परंतु घराचे क्षेत्रफळ तेवढेच राहिले. आजही शहरातील अनेक भागांमध्ये पिण्याचे स्वच्छ व पुरेसे पाणी, पुरेशा स्वच्छ व स्वतंत्र शौचायलाच्या व्यवस्था नाहीत. अशा वसाहतीत राहर्णायांमध्ये सर्वसामान्यांसह सरकारी अधिकारी-कर्मचार्यांची संख्याही मोठी आहे. कारण सगळ्याच अधिकारी-कर्मचार्यांना सरकारी निवासस्थानांची सुविधा मिळते असे नाही. जे सरकारी वसाहतीत राहतात त्या वसाहतींची अवस्थाही काही टॉप क्लास नाही. या सरकारी वसाहतीही तीस, चाळीस किंवा पन्नास-पन्नास वर्षे जुन्या झाल्यात. जुन्या, मोडकळीस आलेल्या या वसाहतींमध्ये नोकरदार जीव मुठीत घेऊन राहतात. त्यामुळे सरकारी अधिकारी आणि कर्मचार्यांसाठी प्रशस्त घरे बांधण्याची घोषणा नक्कीच सकारात्मक म्हणावी लागेल. सरकारी कर्मचार्यांच्या निवासाचा प्रश्न तत्परतेने सोडवत असताना एसआरए, खासगी सहकारी गृहनिर्माण संस्था, म्हाडा, मिल कामगार, महापालिका, प्रकल्पबाधित अशा विविध श्रेणीत रखडलेल्या गृहनिर्माण प्रकल्पांवरही सरकारने कृपादृष्टी दाखवण्याची नितांत गरज आहे. कारण शहरात असे शेकडोंनी गृहनिर्माण पुनर्विकास प्रकल्प रखडले आहेत. असंख्य पुनर्विकास प्रकल्पात रहिवाशांच्या हक्कांना डावलले जात आहे. काही सरकार दरबारी न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत, तर काहींसाठी रहिवाशांना न्यायालयाच्या खेटा घालाव्या लागत आहेत. सध्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली 2034 नुसार मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए) प्रकल्पांतर्गत झोपडीधारकांना किमान 300 चौरस फुटांचे तुटपुंज्या आकाराचे घर देण्याचे धोरण आहे. तसेच इतर शासकीय योजना आणि पंतप्रधान आवास योजनेंतर्गतही 300 चौरस फुटांचे घर दिले जाते. हे क्षेत्रफळ वाढवून किमान 400 चौ.फू. करावे या मागणीची सरकारला दखल घ्यावीशी वाटत नाही. पुरेशी जागा मिळत नसल्याने झोपडीधारकही पुनर्विकास करण्यास पुढे येत नाहीत, परिणामी मुंबईतील झोपड्यांचा प्रश्न कायम आहे. म्हाडा प्राधिकरणाकडून सुरू असलेल्या बीडीडी पुनर्विकास प्रकल्पाकडे सर्वांचे लक्ष आहे. या प्रकल्पांतर्गत रहिवाशांना 500 चौ. फुटांचे घर मिळाल्याने बहुतांश रहिवासी समाधानी दिसतात. परंतु, म्हाडाचे इतर काही मोठे प्रकल्प वादाच्या भोर्वयात सापडलेले आहेत. यामध्ये सिद्धार्थ नगर अर्थात पत्रा चाळ, मोतीलाल नगर यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. पत्राचाळीतील रहिवाशांना 18 वर्षे उलटूनही हक्काची घरे मिळालेली नाहीत. विकासकाने बांधलेली घरे निकृष्ट दजार्ची असूनही म्हाडा ही घरे घेण्यासाठी रहिवाशांवर दबाव टाकत असल्याने रहिवाशांमध्ये संताप आहे. दुसरीकडे, मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या विरुद्ध डीसीपीआर 33(5) चे पालन न करता म्हाडा मोतीलाल नगरकरांवर पुनर्विकास प्रकल्प लादत असल्याचे म्हटले जात आहे. रहिवाशांच्या हक्काची जागाही बिल्डरच्या घशात घातली जात असल्याचा रहिवाशांचा आरोप आहे. या प्रकल्पांवरुनही रहिवाशांमध्ये रोष आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्पाचीही वेगळी कथा नाही.

# राजकारणातील महिलांची गुणात्मक वाढ कधी होणार?

राजकारणात महिलांची संख्यात्मक वाढ झाली आहे. परंतु खरी गरज आहे ती गुणात्मक वाढीची. स्थानिक पातळीवर अनेक महिला उत्तम काम करताहेत, परंतु तुलनेने त्यांचे प्रमाण कमी असल्याचे आढळून आले आहे. हे चित्र महाराष्ट्रापुरते मर्यादित नाही.







महाराष्ट्रात अलीकडेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या. नगरपालिका, नगरपंचायती, महापालिका आणि नंतर १२ जिल्हा परिषदांच्या निवडणुका पार पडल्या. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका म्हणजे अगदी गावपातळीपासूनच्या लोकांशी, त्यांच्या रोजच्या जगण्याशी संबंधित प्रश्नांवरच्या निवडणुका असतात. त्यामुळे त्यांना विशेष महत्त्व असते. आणखी एका दृष्टिकोनातून या निवडणुका महत्त्वाच्या असतात. ते म्हणजे महिला उमेदवारांची मोठी संख्या.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण आहे. त्यामुळे एकूण जागांच्या निम्म्या जागा महिलांसाठी राखीव असतात. स्वाभाविक पुरुषांइतकीच, किंबहुना अनेकदा पुरुषांहून अधिक संख्या महिलांची असते. त्याचे कारण महिला राखीव जागांवर महिला उभ्या असतातच. परंतु काही सर्वसाधारण जागांवरही महिला निवडणूक लढवतात आणि निवडूनही येतात. त्यामुळे पुरुषांपेक्षा त्यांची संख्या जास्त असू शकते.

अलीकडे ज्या निवडणुका झाल्या, त्यांच्या आकडेवारीवर नजर टाकली तर असे दिसते की, २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींच्या म्हणजे एकूण २८८ संस्थांच्या निवडणुका झाल्या. या एकूण संस्थांवर ६८५१ उमेदवार निवडून आले. त्यापैकी महिलांची संख्या ५० टक्के गृहित धरली तर ती ३४२५ इतकी होते.

जिल्हा परिषदांच्या १२ आणि पंचायत समित्यांच्या ९१ निवडणुका झाल्या. जिल्हा परिषदांमध्ये निवडून आलेल्या सदस्यांची संख्या ७३१ आहे, म्हणजे महिलांची संख्या ३६५ किंवा त्याहून अधिक आहे. पंचायत समित्यांमध्ये १४६२ सदस्य निवडून आले आहेत, त्यापैकी महिलांची निम्मी संख्या ७३१ होते.

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका झाल्या, त्यात २८६९ सदस्य निवडून आले, म्हणजे महापालिकेवर निवडून आलेल्या महिलांची संख्या १४३५ होते. अर्थात ही आकडेवारी ५० टक्के आरक्षणानुसार आहे.

आजघडीला म्हणजे ज्या ताज्या निवडणुका झाल्या आहेत, त्यामधून एवढ्या मोठ्या संख्येने महिला स्थानिक स्वराज्य संस्थांवर निवडून आल्या आहेत. स्थानिक सत्तेमध्ये महिलाराज किती प्रबळ आहे, याची कल्पना यावरून येऊ शकते. एकेकाळी राजकारण हे क्षेत्र स्त्रियांसाठी नसल्याची टीका होत होती. परंतु आरक्षणामुळे एवढ्या मोठ्या संख्येने स्त्रिया राजकारणात उतरल्या आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी आरक्षण आहे. परंतु विधिमंडळ आणि संसदेत स्त्रियांना आरक्षण नाही. त्यामुळे राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर महिलांचे पुरेसे प्रतिनिधित्व नाही. परंतु २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपासून महिलांना संसदेत आणि विधिमंडळात ३३ टक्के आरक्षण देण्याचे जाहीर केले असले तरी त्यात अजूनही स्पष्टता आलेली नाही. ही स्पष्टता जेव्हा येईल, तेव्हाच कायदे बनवणाऱ्या सभागृहातही महिलांचे प्रमाण अधिकच वाढेल. त्याचा गुणात्मक फरक एकूण कारभारामध्ये दिसून आल्यावाचून राहणार नाही.

राजकारणात महिलांची संख्यात्मक वाढ झाली आहे, परंतु खरी गरज आहे ती गुणात्मक वाढीची. स्थानिक पातळीवर अनेक महिला उत्तम काम करताहेत. त्या तुलनेने त्यांचे प्रमाण कमी असल्याचे आढळून आले आहे. आता हे चित्र महाराष्ट्रातले आणि स्थानिक सत्तेपुरते मर्यादित आहे का, तर त्याचे उत्तर नाही असे देता येईल. देशात आणि जगभरातही तशीच स्थिती आहे. त्यासाठी एक ताजा अहवाल आपण पाहू शकतो. जगभरात महिलांना अजूनही राजकीय सत्तेत समान स्थान मिळालेले नाही, असे या अहवालातून स्पष्ट झाले आहे. Inter-Parliamentary Union (IPU) आणि वठ Women यांनी हा अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यानुसार सध्या जगात फक्त २८ देशांमध्ये महिलांकडे सरकारचे प्रमुखपद आहे, तर १०१ देशांमध्ये आजपर्यंत एकही महिला राष्ट्रप्रमुख किंवा सरकारप्रमुख झालेली नाही.

जागतिक पातळीवर महिलांकडे सत्तेची सूत्रे देण्यामध्ये किती उदासीनता आहे, हे यावरून दिसून येते. भारतीय उपखंडात भारताच्या इंदिरा गांधी, पाकिस्तानच्या बेनझीर भुत्तो, बांगलादेशच्या शेख हसीना, खलिदा झिया, म्यानमारच्या आँग सान स्यू की, श्रीलंकेच्या सीरिमाओ भंडारनायके, चंद्रिका कुमारतुंगा अशा नेत्यांची नावे समोर येतात. ब्रिटनच्या मार्गारेट थॅचर या इंदिरा गांधी यांच्या समकालीन नेत्या लोकप्रिय होत्या. अशी अनेक नावे घेता येतील.

न्यूयॉर्कमध्ये ११ मार्च २०२६ रोजी झालेल्या महिलांविषयक परिषदेमध्ये (CSW70) यासंबंधीचा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. ही परिषद संयुक्त राष्ट्रांची महिला हक्क आणि लिंग समानतेवर दरवर्षी होणारी मोठी बैठक असते. IPU आणि UN Women यांच्या मते, महिलांच्या राजकीय नेतृत्वाचा विकास नुसता थांबलेलाच नाही, तर काही ठिकाणी त्याची अधोगती होत असल्याचे दिसून येते.

सध्याच्या आकडेवारीनुसार जगभरात : मंत्रिमंडळातील २२.४% पदे महिलांकडे आहेत. संसदेतील २७.५% जागा महिलांकडे आहेत. संसदेमधील महिलांचे प्रमाण २०२५ मध्ये २७.२% होते, त्यापेक्षा थोडी वाढ झाली आहे. परंतु मंत्रिमंडळातील महिलांचे प्रमाण २०२४ मध्ये २३.३% होते, ते आता २२.४% वर आले आहे, म्हणजे काही वर्षांपासून होत असलेली वाढ खुंटली आहे. महिलांना महत्त्वाच्या मंत्रालयांपासून दूर ठेवले जाते ज्या देशांमध्ये महिलांना उच्च पदे मिळतात, तिथेही त्यांना बहुतेक वेळा महिलांशी संबंधित विषयांचीच मंत्रालये दिली जातात, असे निरीक्षण अहवालात नोंदवले आहे.

उदाहरणार्थ : लिंग समानता मंत्रालयांपैकी ९०% मंत्रालयांचे नेतृत्व महिलांकडे आहे. कुटुंब आणि बालकल्याण मंत्रालयांपैकी ७३% मंत्रालये महिलांकडे आहेत. पण संरक्षण (Defence), गृह मंत्रालय (Home Affairs), न्याय मंत्रालय (Justice), अर्थ मंत्रालय (Economic Affairs) अशा महत्त्वाच्या आणि शक्तिशाली मंत्रालयांवर पुरुषांचे वर्चस्व कायम आहे. भारतात अर्थमंत्रालय निर्मला सीतारामन यांच्याकडे आहे, हे इथे विशेष नोंद करायला हवे.

### धमक्या आणि दबाव

महिलांना राजकारणात कशा प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागतो हेही या अहवालात मांडण्यात आले आहे. सर्वेक्षणानुसार : ७६% महिला खासदारांनी सांगितले की त्यांना लोकांकडून धमक्या किंवा दडपणाचा सामना करावा लागतो. पुरुष खासदारांमध्ये हे प्रमाण ६८% आहे. संयुक्त राष्ट्रांच्या महासचिवांच्या अलीकडील अहवालात एक गंभीर वास्तव समोर आले आहे. महिलांना आणि पुरुषांना पूर्णपणे समान कायदेशीर हक्क मिळाले आहेत, असा एकही देश जगाच्या पाठीवर नाही, असे या अहवालात म्हटले आहे.

एकूणच आजच्या काळात स्त्रियांच्या राजकारणातील सहभागाची सकारात्मक चर्चा करीत असताना त्यासंदर्भातील काही अडथळेही विचारात घ्यावे लागतात. ते अडथळे दूर करण्याबरोबरच समान कायदेशीर अधिकार आणि महिलांचा सक्रिय सहभाग यासाठी प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे.

## पनीर-पुदिना कटलेट

**साहित्य :** २५० ग्राम ताजं पनीर, १/२ कप शिंगाड्याचे पीठ, २-३ हिरव्या मिरच्या, १/२ चमचा वाळवलेली पुदिन्याची पूड, १/२ चमचा लिंबाचा रस, बारीक चिरलेली कोथिंबीर, उपवासाचे मीठ चवीप्रमाणे.

**कृती :** पनीर कटलेट्स करण्यासाठी सर्वप्रथम पनीरला किसून घ्या. हिरव्या मिरच्यांना बारीक चिरून शिंगाड्याच्या पिठात पनीर आणि मिरच्या घाला. आता उरलेले साहित्य वाळवलेली पुदिन्याची पूड, लिंबाचा रस, मीठ, बारीक चिरलेली कोथिंबीर टाकून त्याला मिक्स करून हवे त्या आकाराचे कटलेट करा. तवा गरम करून त्यावर थोडे तूप किंवा शेंगदाण्याचे तेल टाकून दोन्हीकडून कुरकुरीत खमंग शॅलो फ्राय करून घ्या. तयार कटलेट्सला दही किंवा हिरव्या चटणीसोबत सर्व्ह करा.



# आपल्या स्वयंपाकघरातच आहेत सौंदर्यप्रसाधने



तुमच्या केसांपासून ते पायांच्या नखांपर्यंत सर्व गोष्टींची निगा राखण्यास मदत करण्यासाठी विविध तऱ्हेची सौंदर्यप्रसाधने बाजारामध्ये उपलब्ध आहेत. पण या सर्व प्रसाधनांमध्ये अगदी कमी प्रमाणात का होईना, पण रसायने असतातच. त्यामुळे क्वचितप्रसंगी या सौंदर्यप्रसाधनांमुळे ॲलर्जीदेखील उद्भवू शकते. हा धोका टाळायचा असेल, तर घरी तयार केलेली, नैसर्गिक पदार्थ असलेली प्रसाधने वापरणे कधीही अधिक सोयीस्कर आणि फायद्याचे असते. घरी प्रसाधने तयार करण्यासाठी थोडाफार वेळ खर्ची घालावा लागत असला, तरी त्यापासून आपल्या त्वचेला किंवा केसांना मिळणारे फायदे पाहता, घरी प्रसाधने तयार करण्यासाठी थोडा वेळ जरूर द्यावा.



**साखर :** थंडीमध्ये किंवा उन्हाळ्यामध्ये ओठ कोरडे पडून खरखरीत होतात. याचा उपाय आपल्या स्वयंपाकघरामध्ये अगदी सहज उपलब्ध आहे, तो म्हणजे साखर. साखरेमुळे त्वचेवरील मृत पेशी हटवल्या जाऊन, त्वचेमध्ये कोलाजेनचे प्रमाण वाढते. याकरिता एक टीस्पून खोबरेल तेलामध्ये एक लहान चमचा मध मिसळावा. या मिश्रणात दोन मोठे चमचे साखर घालून, मग थोडासा लिंबाचा रस घालावा आणि हे मिश्रण व्यवस्थित एकत्र करावे. ही तयार झालेली पेस्ट ओठांवर हळुवार गोलाकार चोळावी. दहा मिनिटे ही पेस्ट ओठांवर राहू देऊन, त्यानंतर पाण्याने धुवून टाकावी. ओठ टॉवेलने हळुवार कोरडे करून व्हॅसलिन लावावे. या उपायाने ओठ नेहमी मृदू राहतील.



**नारळ :** नारळाच्या दुधामध्ये 'ई' जीवनसत्त्व व केसांना पोषक नैसर्गिक तेले मुबलक मात्रेमध्ये असतात. ॲवोकाडोमध्ये केसांच्या पोषणासाठी आवश्यक प्रथिने व केसाच्या मुळांना पोषक तत्त्वे असतात. नारळाचे दूध व ॲवोकाडो वापरून तयार केलेला मास्क केसांसाठी वापरला असता, केस चमकदार आणि मुलायम बनतात. हा मास्क तयार करण्यासाठी ॲवोकाडो आणि नारळाचे दूध एकत्र करून त्यांची पेस्ट तयार करावी. ही पेस्ट केसांच्या मुळांपासून टोकांपर्यंत व्यवस्थित लावून घ्यावी. अर्धा तास ही पेस्ट केसांवर राहू देऊन त्यानंतर केस धुवावेत. या हेअर मास्कमुळे केसांच्या मुळांना ताकद मिळून, केसांची वाढ चांगली होते.



**ऑलिव्ह ऑईल :** नैसर्गिक मेकअप रिमूव्हर म्हणून ऑलिव्ह ऑईलचा वापर करावा. मेकअपसाठी वापरण्यात येणाऱ्या सौंदर्यप्रसाधनांमध्ये थोड्या प्रमाणात ॲस्ट्रिंजंट असते, ज्यामुळे आपली त्वचा कोरडी पडू लागते. मेकअप उतरवण्याकरिता ऑलिव्ह ऑईल वापरल्याने मेकअप संपूर्णपणे साफ होतोच, पण त्याशिवाय त्वचेचा कोरडेपणा दूर होऊन, त्वचेला आर्द्रता मिळते.

**टोमॅटो :** त्वचेची निगा राखण्याकरिता प्रत्येक वेळी ब्युटी पार्लरकडे धाव न घेता, घरच्या घरीच उत्तम फेस मास्क तयार करावा. नितळ, सुंदर त्वचेकरिता टोमॅटो अतिशय चांगला पर्याय आहे. टोमॅटोमधील 'अ' जीवनसत्त्व त्वचेवरील डाग हलके करण्यास सहाय्यक आहे. तसेच यामध्ये मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असल्याने त्वचेचा पोत सुधारून, त्वचा चमकदार बनते. हा मास्क बनवण्याकरिता एका टोमॅटोची पेस्ट चेहऱ्यावर लावून वीस मिनिटे राहू द्यावी. त्यानंतर चेहरा थंड पाण्याने धुवावा. या उपायाने त्वचा त्वरित उजळते.

**मध आणि बदामाची पूड :** हात कोरडे पडून रखरखीत होत असल्यास त्यासाठी मास्क घरच्या घरी तयार करता येतो. एक लहान चमचा मधात थोडा लिंबाचा रस घालावा. त्या मिश्रणामध्ये एक मोठा चमचा बदामाची पूड व एक लहान चमचा अक्रोडची पूड घालावी. अक्रोडची पूड नसल्यास एक चमचा सूर्यफुलाचे तेल घालावे व हे मिश्रण हाताना चोळावे. पाच मिनिटांनी हात गार पाण्याने स्वच्छ धुवून टाकावेत. या उपायाने हात मुलायम राहतील.

# शहाळे : आरोग्याचा खजिना



कोवळा नारळ सर्वांनाच आवडतो. पण तो आरोग्यदायी घटकांचा खजिना असतो हे अनेकांना माहीत नसते. मोठे सेलिब्रिटीज, चित्रपट अभिनेते आणि अभिनेत्रींनाही नारळाच्या पाण्याचे महत्त्व कळते. अर्थात ते त्यांना कळते आणि ते हॉटेलातल्या महागड्या पेयांपेक्षाही शहाळे पिणे पसंत करतात. सामान्य लोकांनी त्यांचे अनुकरण म्हणून नाही पण नारळाचे महत्त्व समजून घेऊन त्याचा समावेश आपल्या रोजच्या आहारात केला पाहिजे. कोवळा नारळ हे निसर्गाने आपल्याला दिलेले वरदान आहे. २००६ साली करण्यात आलेल्या एका पाहणीनंतर शहाळ्याची वैशिष्ट्ये जर्नल ऑफ मेडिसिनल फूड या मासिकांत प्रकाशित करण्यात आली होती. त्यात शहाळ्याने शरीरातले कोलस्टेरॉल कमी होते असे म्हटले होते.

**आपल्याला** निसर्गाने नारळातून जे काही अनमोल असे दिले आहे त्यात कोणीही कसलीही भेसळ करू शकत नाही, हे त्याचे खास वैशिष्ट्य आहे. नारळाचे पाणी नेहमीच फ्रेश असते. ते कधी शिळे होत नाही. ते थंड असते. रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास त्याचा उपयोग होतो. एकदा याबाबत एक पाहणी करण्यात आली असता असे लक्षात आले की, पाहणीत गुंतलेल्या रुग्णांपैकी ७१ टक्के रुग्णांचा रक्तदाब कसलीही औषधे न देता केवळ शहाळ्याच्या पाण्याने कमी झाला. शहाळ्यातल्या मॅग्नेशियममुळे इन्सुलीन सेन्सिटीव्हिटी वाढते आणि मधुमेहाच्या रुग्णाला दिलासा मिळतो. ब्लड शुगर लेव्हल कमी होते. नारळाच्या पाण्यातले सोडियम आणि काही जीवनसत्त्वे ही ब्लड शुगर कमी करण्यास मदत करीत असतात. हे पाणी फ्री पार्टिकल्स आणि क्रिस्टल्स तयार करण्यास प्रतिबंध करते त्यामुळे किडनी स्टोन तयार होण्याचे टळते. काही कारणाने आणि अन्नात दोष निर्माण झाल्याने पचनशक्तीवर काही विपरीत परिणाम झाला असेल तर नारळाचे पाणी दिवसातून दोन वेळा प्यावे त्यामुळे पचनशक्ती ताळ्यावर यायला मदत होते. कारण या पाण्यात तंतुमय पदार्थ मोठ्या प्रमाणावर असतात. काही वेळा जुलाब होतात आणि डीहायड्रेशन होते. अशा वेळी नारळाचे पाणी प्यावे त्यामुळे शरीरातले पाण्याचे प्रमाण वाढते आणि डीहायड्रेशनमुळे आलेला अशक्तपणा कमी होतो. या पाण्याने चेहऱ्यावर तकाकी येते. केसही चांगले होतात. जगात गाजलेल्या काही टेनिसपटूंनी आपल्या तंदुरुस्तीचे रहस्य कोकोनट वॉटर हेच असल्याचे म्हटले होते. काही मॅरेथॉनपटूंनीही शहाळ्याला श्रेय दिले होते.



# 'ग्रीन टी'च्या अतिसेवनामुळे होऊ शकतात या समस्या

मागील काही वर्षांत भारतात ग्रीन टीचे सेवन अधिक वाढले आहे. ग्रीन टी आरोग्यासाठी चांगले आहे, यात शंकाच नाही. ग्रीन टीमध्ये अनेक प्रकारचे अँटीऑक्सिडेंट्स असतात. जे शरीरातील मेटाबॉलिज्म सुधारते, कॉलेस्ट्रॉल कमी करते. ग्रीन टी जिंक, मॅग्नीज आणि व्हिटामीन ए, बी, सी ची मात्रादेखील असते. मात्र हे सर्व फायदे असले तरी ग्रीन टीच्या अतिसेवनामुळे आरोग्याला देखील नुकसान पोहोचते.



**तोंडात फोडी येणे :** ग्रीन टीमध्ये टॅनिंस तत्त्व असते. जास्त ग्रीन टी प्यायल्याले टॅनिंस त्वचा कोरडी पडणे, तोंड कोरडे पडणे, पोट दुखणे आणि तोंडात फोडी येणे यासारख्या समस्या होतात.

**ब्लड प्रेशर वाढते :** अधिक प्रमाणात ग्रीन टीचे सेवन केल्याने ब्लड प्रेशरचा देखील धोका निर्माण होतो. ग्रीन टीमध्ये कॅफिन अधिक मात्रेत असतात. याच्या अधिक सेवनाने हृदयावर दबाव पडतो व तुमचे ब्लड प्रेशर वाढते.

**अशक्तपणा होऊ शकतो :** ग्रीन टीमध्ये काही असे तत्त्व असतात, जे शरीरातील आयरनला (लोह) शोषून घेण्यापासून रोखते. त्यामुळे तुम्ही ग्रीन टीचे अधिक सेवन करत असाल तर तुम्ही ज्या पदार्थांचे सेवन करता त्यातील आयरन शरीराला मिळणार नाहीत. अशा परिस्थितीत रेड ब्लड सेल्स कमी होतात आणि अशक्तपणा येऊ शकतो.

**मानसिक तणाव आणि चिंता वाढणे :** ग्रीन टी तणाव कमी करण्यासाठी फायदेशीर आहे. मात्र अति सेवनामुळे याचा उलट परिणाम होऊन मानसिक तणाव आणि चिंतादेखील वाढते.

# गुणांचा खजिना - घृतकुमारी (ॲलोवेरा/कोरफड)

**ॲलो**वेरा आपल्या घरामध्ये किंवा ऑफिसमध्ये विनासायास लावता येण्यासारखे असते. आजकाल ॲलोवेराचे आरोग्याच्या दृष्टीने फायदे समोर यावयास लागल्याने रस, जेल अशा अनेक प्रकारे लोक ॲलोवेराचा उपयोग करताना दिसत आहेत. दात घासल्यानंतरही दातांमध्ये प्लाक किंवा किटाणू राहतातच. त्यामुळे तोंडामधून क्वचित दुर्गंधी येऊ लागते. ही दुर्गंधी येऊ नये यासाठी माऊथवॉश उपयोगात आणला जातो. ॲलोवेराच्या रसाचा वापरदेखील प्राकृतिक माऊथवॉश म्हणून करता येतो. या रसामुळे तोंडातील प्लाक आणि किटाणू दूर होऊन दातांचे आरोग्य चांगले राहते. ॲलोवेराचा वापर माऊथवॉश म्हणून केल्याने हिरड्याही बळकट होतात. कित्येकदा जेवण जास्त झाल्याने, जेवणाच्या वेळा गडबडल्याने किंवा जास्त तिखट, मसालेदार पदार्थ खाल्ल्याने छातीत जळजळ होत असल्याची भावना होते किंवा ॲसिडीटी होते. अशावेळी ॲलोवेराच्या रसाच्या सेवनाने फायदा होतो. यामुळे छातीतील जळजळ दूर होऊन ॲसिडीटीही कमी होते. तसेच दररोज सकाळी रिकाम्या पोटी ॲलोवेराचा रस कोमट पाण्यातून घेतल्यास पोट साफ होण्यास मदत होते. केस गळत असल्यास ॲलोवेराचा गर केसांना लावल्याने फायदा होतो. तसेच चेहऱ्यावर उष्णतेमुळे मुरुमे येत असल्यासही ॲलोवेराच्या गराने फायदा होतो. या गराने त्वचेचा रंग उजळण्यास व पोत सुधारण्यास मदत होते. त्याचमुळे पुष्कळशा स्कीन क्रीम्समध्ये ॲलोवेराच्या गराचा अंश मिसळलेला असतो. ॲलोवेराच्या गराच्या वापराने वयपरत्वे त्वचेवर आलेल्या सुरकुत्याही कमी होतात व त्वचा सुंदर दिसू लागते.



# जुन्या मोबाइल फोनचा स्पीड कसा वाढवायचा? जाणून घ्या सोप्या ट्रिक्स

अनेक वर्ष एकच मोबाइल फोन वापरल्यामुळे तो स्लो होऊ शकतो. असा स्मार्टफोन काही ट्रिक्सच्या मदतीने फास्ट करता येतो. यात फॅक्ट्री रीसेट, अँड्रॉइड अपडेट, फोन स्टोरेज क्लियर करणे, लाइट ॲप्सचा वापर इत्यादी ऑप्शन आहेत.



असे अनेक लोक आहेत जे एक मोबाइल कमीत कमी ३-४ वर्ष वापरतात. विशेषतः मीडिल क्लास कुटुंबात युजर एकच स्मार्टफोन अनेक वर्ष वापरतात. परंतु स्मार्टफोन जुना झाल्यावर त्याची परफॉर्मन्सदेखील स्लो होऊ लागतो. त्यामुळे रोज फोन वापरताना समस्या येऊ लागतात. ही समस्या सोडवण्यासाठी आम्ही काही ट्रिक्स सांगितल्या आहेत ज्यामुळे जुन्या फोनचा स्पीड वाढू शकतो.

फॅक्ट्री रीसेटमुळे अनेक समस्या सोडवता येतात. फॅक्ट्री रीसेट तुमच्या स्मार्टफोनला पुन्हा फास्ट, स्मूद व नव्यासारखा बनवण्याची चांगली पद्धत आहे. स्मार्टफोन रीसेट करण्यापूर्वी तुमच्या मोबाइल फोनच्या डेटा बॅकअप घेणं आवश्यक आहे. तुम्ही मोबाइलमधील सर्व ॲप्स, फोटो, व्हिडीओ तसेच अन्य फाईल्स देखील तुमच्या डाटा बॅकअपमध्ये घेऊ शकता. फोन बॅकअप स्मार्टफोनमधील मायक्रोएसडी कार्ड किंवा गुगलमध्ये स्टोर केला जाऊ शकतो, त्यामुळे फोन फॅक्ट्री रीसेट झाल्यानंतर पुन्हा रिकव्हर करता येईल.

**अँड्रॉइड अपडेट**

अँड्रॉइड स्मार्टफोन्स गुगलद्वारे बनवण्यात येणाऱ्या अँड्रॉइड ओएसवर चालतात. ही कंपनी दरवर्षी आपल्या अँड्रॉइड ऑपरेटिंग सिस्टमचं नवीन व्हर्जन घेऊन येते ज्यात अनेक नवीन अपडेट असतात. विशेष म्हणजे अँड्रॉइड ओएसचा नवीन अपडेट फक्त नवीन फीचर्स घेऊन येत नाही तर त्यात अनेक बग्स काढले जातात. वेगवेगळ्या ॲप्स, वेबसाइट्स, गेम्स, ऑनलाइन ॲक्टिव्हिटी तसेच इंटरनेट ॲक्सेसमुळे तुमच्या स्मार्टफोनमध्ये अनेक प्रकारचे बग्स देखील येतात त्यामुळे फोनच्या प्रोसेसिंगवर एक्स्ट्रा लोड येतो. हे बग्स फक्त प्रोसेसिंग स्लो करत नाहीत तर अनेक ॲप्सवर देखील प्रभाव टाकतात. अँड्रॉइड अपडेट्समध्ये डेव्हलपर हे बग्स काढून टाकण्याचे कोड टाकतात. त्यामुळे तुमचा स्मार्टफोन कायम नवीन अँड्रॉइड व्हर्जनवर अपडेट करावा.

**फोन स्टोरेज**

फोनची स्टोरेज भरल्यामुळे डिव्हाइसच्या प्रोसेसिंगवर प्रभाव पडतो आणि तो स्लो होतो. Support.google नुसार जर तुमच्या स्मार्टफोनची स्टोरेज ९० टक्क्यांपर्यंत फुल होते तेव्हा फोनमध्ये प्रॉब्लम येण्यास सुरुवात होऊ शकते. अशावेळी तुमच्या फोन स्टोरेज वर लक्ष ठेवावं आणि अनावश्यक फोटोज व व्हिडीओज डिलीट करावे. अत्यावश्यक मीडिया फाइल्सचा इतरत्र बॅकअप घेऊन मोबाइलमधून काढून टाकाव्यात.

**लाइट अँड्रॉइड ॲप्सचा वापर**

लाइट अँड्रॉइड ॲप्स जुन्या मोबाइल फोन्ससाठी उपयुक्त ठरू शकतात. हे ॲप्स फोनमध्ये कमी स्टोरेज वापरतात तसेच जास्त इंटरनेट देखील वापरत नाहीत. असे ॲप्स वापरल्यावर फोनच्या प्रोसेसर व बॅटरीवर देखील जास्त लोड येत नाही. विशेष म्हणजे लाइट अँड्रॉइड ॲप्स फुल व्हर्जनच्या फास्ट असतात. हे लाइट अँड्रॉइड ॲप्स कमी रॅम व जुन्या प्रोसेसरवर देखील स्मूद तसेच लॅगफ्री चालतात. उदा. जीमेल गो, गुगल गो, यूट्यूब गो आणि मॅप्स गो तसेच फेसबुक लाइट, मॅसेंजर लाइट, इंस्टाग्राम लाइट इत्यादी.

## 'या' समस्यांना टाळायचं असेल तर साखरेला ठेवा दूर!

**आपल्या** रोजच्या आहारात कमी अधिक प्रमाणात साखरेचं प्रमाण चांगलंच असतं. काही वेळा प्रत्यक्षरीत्या तर काही वेळा अप्रत्यक्षरीत्या साखर आपल्या शरीरात जात असते. साखर शरीरासाठी आवश्यक घटक आहे. मात्र या साखरेचं प्रमाण नियंत्रणात ठेवण्याचीही तितकीच गरज आहे. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा घातक ठरू शकतो. त्याप्रमाणेच साखरेचंही आहे. शरीरात साखरेचं प्रमाण अधिक असेल तर अनेक आजारांना सामोरं जावं लागतं. त्यामुळे आहारात साखरेचं प्रमाण नियंत्रणात असण्याची गरज आहे.



- आहारात साखरेचं प्रमाण जास्त असेल तर त्याचा परिणाम थेट तुमच्या चेहऱ्यावर दिसून येतो. त्यामुळे साखरेचं प्रमाण नियंत्रणात असण्याची गरज आहे. शरीरात साखरेचं प्रमाण नियंत्रणात असेल तर त्वचेचा पोत सुधरतो. त्वचा मुलायम आणि तजेलदार होते. विशेषतः रात्रीच्या वेळी साखरयुक्त पदार्थ कमी खाल्ले तर चेहऱ्यावर सुरकुत्या येत नाहीत. तसंच चेहऱ्यावरील मुरुम, डागही क मी होतात.
- साखरेचं प्रमाण नियंत्रणात असेल तर शांत झोप लागते.
- साखर जास्त खाल्ल्याने जळजळ आणि श्वासोच्छ्वास घेण्यास त्रास होतो.
- साखर खाल्ल्यामुळे वजन झपाट्याने वाढतं. त्यामुळे डोनट्स, पेस्ट्री, केक, मिठाई असे पदार्थ शक्यतो खाणं टाळा.
- साखरेचे प्रमाण जास्त असल्यास स्मरणशक्ती कमकुवत होते.
- साखरेमुळे मधुमेह होण्याची शक्यता असते.

# ओठांचा काळसरपणा दूर करण्यासाठी उपाय...

ओठ काळसर पडण्यामागे अनेक कारणे असू शकतात. असंतुलित आहार, पिग्मेंटेशन, खूप वेळ उन्हामध्ये वावरणे, हलक्या प्रतीची प्रसाधने, विशेषतः हलक्या प्रतीची लिपस्टिक वापरणे, अशा किती तरी कारणांमुळे ओठ काळसर पडू शकतात. पण काही साध्या उपायांचा अवलंब केल्यास ओठांचा रंग पुन्हा पूर्ववत होण्यास सहाय्य मिळते.

**ग्रीन टी**

आपण दिवसभरात अनेकदा चहा किंवा कॉफी घेत असतो. पावसाळ्यात किंवा थंडीच्या मोसमात तर चहा किंवा कॉफी पिण्याचे प्रमाण अजूनच वाढते. पण चहा किंवा कॉफीच्या अतिसेवनाने देखील ओठ काळसर दिसू शकतात. त्यामुळे दिवसातून अनेकदा चहा किंवा कॉफी घेण्यापेक्षा, ग्रीन टीच्या सेवनाचे प्रमाण वाढवा. ग्रीन टीमध्ये असलेले पॉलिफेनॉल्स शरीरातील फ्री रॅडिकल्स कमी करून, उन्हामुळे किंवा चहा - कॉफीच्या अतिसेवनाने काळसर पडलेले ओठ पुन्हा पूर्ववत करण्यास मदत करतात. ग्रीन टी च्या टी-बॅग्स थोड्याशा पाण्याने ओलसर करून घेऊन, त्याने ओठांवर हलक्या हाताने मसाज केल्यासही ओठांचा काळसरपणा दूर होण्यास मदत मिळते, तसेच



**नारळ :** आपल्या आहारात नारळाचा समावेश अवश्य करा. हे आपल्याला निरनिराळ्या प्रकारे करता येईल. नारळाचे पाणी प्या, त्याचे ताजे खोबरे भाज्यांवर किंवा गरमागरम पोहे, उपमा, खिचडीवर घालून खा किंवा कुठल्याही भाजीच्या ग्रेव्हीमध्ये नारळाचे दूध वापरा. नारळाचे तेलही स्वयंपाकामध्ये वापरता येऊ शकेल. नारळाच्या सेवनाने त्वचा नितळ राहते. नारळाचे तेल दररोज ओठांना लावल्यास ओठ गुलाबी व मऊ राहतील.

**मध :** रात्री झोपण्यापूर्वी थोड्या मधाने ओठांवर हलक्या हाताने मसाज करावा. हे मध रात्रभर ओठांवर तसेच राहू द्यावे. मधाचा वापर आपल्या आहारामध्येही नियमित करावा. मधात अँटी ऑक्सिडंट्स व मॅग्नेशियम हा क्षार भरपूर प्रमाणात असल्यामुळे ओठांना मृदुता प्राप्त होऊन, त्यांचा काळसरपणा दूर करण्यास मध उपयुक्त आहे. त्याचप्रमाणे टोमॅटोही ओठांचा काळसरपणा दूर करण्यासाठी उत्तम आहेत. यामध्ये असलेले सेलेनियम सूर्याच्या प्रखर उन्हापासून ओठांचे रक्षण करते. टोमॅटोचा वापर आपल्या आहारामध्ये तर करावाच, शिवाय उन्हामधून फिरून आल्यानंतर त्वरित टोमॅटोची पेस्ट ओठांवर लावावी. असे केल्याने, उन्हामुळे ओठांवर आलेला काळसरपणा दूर होतो.



**अक्रोड :** अक्रोडमध्ये असलेले ओमेगा ३ फॅटी ॲसिड्स त्वचेमधील कोलाजेन वाढवण्यास सहाय्य करतात. त्वचेमध्ये कोलाजेनचे प्रमाण वाढल्याने त्वचा लवचिक होते. अक्रोडची जरा जाडसर पेस्ट बनवून त्याने ओठांवर हलक्या हाताने मसाज करावा. असे केल्याने ओठांच्या त्वचेवरील मृत पेशी निघून जाऊन ओठांचा काळसर पडलेला रंग हलका होण्यास मदत होईल. तसेच दह्याच्या वापराने त्वचा नितळ होऊन त्यावरील सुरकुत्या नाहीशा होण्यास मदत मिळते. त्यामुळे आपल्या आहारामध्ये दह्याचा समावेश अवश्य करावा. दह्यामध्ये थोडेसे केशर घालून त्याने ओठांचा मसाज केला असता, ओठांवरील पिग्मेंटेशनमुळे आलेला काळसरपणा दूर होण्यास मदत मिळेल.

**लिंबाचा रस :** आपल्या शरीरामधील ॲसिड्स व तीव्र अल्कलींमुळे ओठ काळसर पडू शकतात. गरम पाण्यामधून लिंबाचा रस घेतल्याने शरीरामधून ही ॲसिड्स व अल्कली बाहेर टाकण्यास मदत मिळते. लिंबू हे अत्यंत प्रभावी ब्लीच आहे. थोडीशी साखर एका लिंबाच्या लहान फोडीवर घालून त्याने ओठ चोळल्यास ओठांचा काळसरपणा दूर होतो. त्याचप्रमाणे ॲलो व्हेरा किंवा कोरफड, ओठांचा काळसरपणा दूर करण्यास उपयुक्त आहे. ॲलो व्हेराच्या रसाचा समावेश आपल्या आहारात करावा आणि त्याच्या गराने ओठांवर नियमित मसाज करावा. या उपायाने ओठांचा काळसरपणा दूर होऊन ओठ पुनश्च गुलाबी व मृदू होतील.



# पी हळद आणि हो बरी

**मराठीत** एक म्हण आहे. पी हळद अन् हो गोरी. या म्हणीचा अर्थ काही वेगळा आहे. कोणत्याही उपायाचा परिणाम पटकन होत नसतो. हळद प्यायल्यावर लगेच कोणी गोरी होत नसते असे या म्हणीतून सुचवायचे आहे, पण प्रत्यक्षात मात्र हळद ही काही बाबतीत चटकन आणि बराच गुण देणारी आहे. असे काही प्रयोगातही दिसून आले आहे. काही लोकांनी हळद मिसळलेले पाणी दररोज सकाळी प्राशन करून त्याचे फायदे नोंदवले आहेत तर काहींनी हळदीचा चहा किती गुणकारी असतो याचा अनुभव घेतला आहे. दररोज सकाळी साधारण ग्लासभर पाणी घ्यावे. ते गरम करावे आणि कोमट झाल्यावर त्यात अर्धा चमचा हळद मिसळावी. हे पाणी थंड झाल्यावर प्यावे त्याचे अनेक फायदे होतात.



हळद ही जंतुनाशक असते. त्यामुळे ती अनेक रोगांचा सामना करण्यास उपयोगी पडते. काही वेळा ती काही रेडिएशन्सचाही प्रतिकार करण्यास फायदेशीर ठरली आहे. सध्या आपण मोबाईल फोन फार वापरतो आणि त्याच्या रेडिएशन्सचा आपल्यावर काही परिणाम होण्याची शक्यता असते. आपल्याला कोणत्या ना कोणत्या स्वरूपात हळद वापरायला मिळाली तर अशा परिणामांपासून आपण दूर राहू शकतो. हळद पाण्यात मिसळून प्यावी किंवा आहारात तिचा समावेश अवश्य होईल याची दक्षता घ्यावी. आपल्या समाजात दूध आणि हळद पिण्याची पद्धत आहे. त्यामुळे बसलेला घसा मोकळा होतो. घशाला कसला संसर्ग झाला असेल तर हळद आणि दूध गुणकारी ठरते. खोकला आल्यावर तर हळद आणि दूध घेतातच. ते घेतल्यावर दुसरे कसलेही औषध घेण्याची गरज नाही असे मानतात.

काही लोक हळदीचा चहा तयार करतात. तो तयार करण्याची पद्धत आहे. कपभर पाण्यात चमचाभर हळद टाकून हे मिश्रण उकळा. नंतर त्याला खाली उतरवून त्यात थोडा मध टाका. त्याशिवाय त्यात थोडे लिंबू पिळा किंवा त्यात संत्र्याचा रस मिसळा. त्यामुळे या मिश्रणाला चांगली चव येईल. असा हा चहा प्याल्याने वजन कमी होण्यास मदत होते. संधिवाताचा त्रास कमी होतो. शिवाय यात काही मिनरल्स रोगप्रतिकारक आणि कर्करोगास प्रतिबंध करणारे आहेत. जगाच्या काही भागात हळदीचा असा चहा फार लोकप्रिय आहे. कारण त्यामुळे मधुमेहाचा उपद्रव कमी होतो. हळद हे अगदी सहजगत्या उपलब्ध होणारे औषध आहे. त्याचा वापरही आपण करीत असतो, पण त्याचे अनेक फायदे आपल्याला माहीतही नसतात.

## राज्य सरकारचा मोठा निर्णय

# शेतजमिनीच्या वाटणीवरील नोंदणी फी रद्द

**■ बातमी /लेख,**
**प्रीती दिपक नाईक**

राज्यातील शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेला मोठा दिलासा देत राज्य सरकारने शेतजमिनीच्या वाटणीपत्रावर आकारले जाणारे नोंदणी शुल्क संपूर्ण माफ केले आहे. याबाबतचे परिपत्रक महसूल विभागाकडून आज जारी करण्यात आले आहे.

आता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ८५ अंतर्गत येणाऱ्या प्रकरणांसह, आपसातील संमतीने थेट दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीसाठी येणाऱ्या वडिलोपार्जित शेतजमिनीच्या वाटणीपत्रांनाही नोंदणी शुल्कातून पूर्णपणे माफी देण्यात आली आहे. मुख्यमंत्री ददेवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला आहे.




शासनाने २३ जून २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार, कलम ८५ अन्वये एकाच कुटुंबातील सदस्यांनी केलेल्या शेतजमिनीच्या वाटणीपत्रावर कोणतेही नोंदणी शुल्क आकारले जाणार नाही, अशी तरतूद करण्यात आली होती. या कलमांतर्गत वाटणीपत्राचे अधिकार तहसीलदारांना आहेत. परंतु, अनेक नागरिक तहसीलदारांकडे न जाता थेट दुय्यम निबंधक कार्यालयात आपसातील संमतीने वाटणीपत्र नोंदणीसाठी सादर करत होते. अशा वेळी मूळ अधिसूचनेत स्पष्ट तरतूद नसल्याचे कारण देत दुय्यम निबंधक कार्यालयांकडून नोंदणी शुल्क आकारले जात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते.

शेतकऱ्यांचा होणारा हा गोंधळ दूर करण्यासाठी शासनाचे महत्वाचे पाऊल उचलले असून महसूल विभागाने आता याबाबत स्पष्ट आदेश दिले आहेत. नवीन स्पष्टीकरणानुसार कलम ८५ अंतर्गत तहसीलदार स्तरावरून होणाऱ्या वाटणीपत्रांच्या नोंदणीसाठी कोणतेही शुल्क लागणार नाही. वडिलोपार्जित शेतजमिनीबाबत वारसा हक्क प्राप्त झालेल्या सर्व सहधारकांनी एकत्र येऊन थेट नोंदणी कार्यालयात सादर केलेल्या वाटणीपत्रालाही आता नोंदणी शुल्कातून सूट मिळेल.

एकाच कुटुंबातील सदस्यांमध्ये झालेल्या शेतजमिनीच्या वाटप दस्तावरही कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. या निर्णयामुळे शेतजमिनीच्या वाटणीसाठी होणारा खर्च वाचणार असून प्रलंबित वादांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.

**राज्यातील सर्व शेतकऱ्यांना फायदा होणार आहे : चंद्रशेखर बावनकुळे**

एकाच कुटुंबातील सदस्यांनी आपसात वडिलोपार्जित जमीनीचे वाटप केल्यास त्याचे नोंदणी शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. हे अधिकार तहसीलदारांना होते. पण, काही लोक थेट दुय्यम निबंधक कार्यालयात जाऊन नोंदणी करत होते. त्यासाठीच्या नियमात स्पष्टता नसल्याने नोंदणी फी आकारली जात होती. ही अडचण दूर करण्यासाठी नव्याने हे स्पष्टीकरण देण्यात आले असून आता तहसीलदार किंवा नोंदणी कार्यालयात कुठेही गेला तरी नोंदणी फी भरावी लागणार नाही. याचा राज्यातील सर्व शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

## अनधिकृत प्रवासी वाहतुकीवर कारवाई सुरू

### वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर परिवहन विभाग सक्रिय

अनधिकृतपणे प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर धडक कारवाई करण्याची मोहीम परिवहन विभागाने हाती घेतली आहे. राज्यात गेले काही दिवसांत झालेल्या गंभीर अपघातांमुळे प्रशासन सक्रिय झाले आहे. या कारवाईमुळे प्रवाशांचा प्रवास सुरक्षित होण्यास मदत होणार आहे.



**■मुंबई। प्रतिनिधी,**

अनधिकृतपणे प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर धडक कारवाई करण्याची मोहीम परिवहन विभागाने हाती घेतली आहे. राज्यात गेले काही दिवसांत झालेल्या गंभीर अपघातांमुळे प्रशासन सक्रिय झाले आहे. या कारवाईमुळे प्रवाशांचा प्रवास सुरक्षित होण्यास मदत होणार आहे. कल्याण-मुरबाड महामार्गावर रायते गावाच्या हद्दीत भीषण अपघात झाला होता. कल्याणकडून अनधिकृतपणे प्रवासी वाहतूक करणाऱ्या टॅक्सी आणि मिक्सरची धडक झाली. या अपघातात चारचाकी वाहनातील ११ प्रवाशांचा मृत्यू झाला.

**विविध ठिकाणी तपासणी नाके**

या घटनेनंतर राज्यभरातील प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) आणि वाहतूक पोलिसांच्या संयुक्त पथकांकडून विविध ठिकाणी तपासणी नाके उभारण्यात आले आहेत. यामध्ये परवान्याविना धावणारी प्रवासी वाहने, अवजड वाहनांद्वारे नियमभंग, तसेच क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात येत आहे. मुंबई शहर आणि उपनगरामध्ये शेअर टॅक्सी, रिक्षामधून अनधिकृतपणे वाहतूक होत आहे. यामुळे प्रवाशांचा जीव धोक्यात आला असल्याकडे मात्र परिवहन विभाग आणि वाहतूक पोलिसांकडून दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे.

**अनधिकृत वाहतुकीमुळे जीवितहानी**

नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्याबरोबरच चालकांचे परवाने निलंबित करण्याची प्रक्रिया सुरू आहे तसेच वारंवार नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशाराही दिला आहे. दरम्यान, काही अपघातांमध्ये अनधिकृत वाहतुकीमुळे जीवितहानी झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे अशा वाहनांविरोधात 'शून्य सहनशीलता' धोरण अवलंबण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला असल्याचे परिवहन विभागाच्या अधिकाऱ्याने सांगितले.

## अनैतिक संबंधात अडथळा

### पोटच्या दिव्यांग मुलाला डोळ्यात चटणी टाकून संपवलं

**■मुंबई। प्रतिनिधी,**

तेलंगणातील कामारेड्डी येथील श्रीराम नगर कॉलनीमध्ये माणुसकीला काळिमा फासणारी एक अत्यंत क्रूर आणि संतापजनक घटना समोर आली आहे. एका पाच वर्षांच्या निष्पाप आणि हतबल बालकाची त्याच्याच जन्मदात्या आईने आणि तिच्या लिव्ह-इन पार्टनरने मिळून निर्घृण हत्या केली आहे. या घटनेने संपूर्ण परिसर हादरला असून समाजातील नैतिक अधःपतनावर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. स्वतःच्या सुखासाठी आणि अनैतिक संबंधांना वाट करून देण्यासाठी एका आईने आपल्या काळजाच्या तुकड्याला अशा प्रकारे संपवणे, हे ऐकून कोणाच्याही अंगावर शहारे येतील. पोलिसांनी या प्रकरणी अत्यंत वेगाने तपास करून आरोपी आई आणि तिच्या जोडीदाराला बेड्या ठोकल्या आहेत, मात्र या घटनेतील क्रूरता पाहून पोलीस अधिकारीही चक्रावून गेले आहेत.

घटनेच्या दिवशी या क्रूर कटाची अंमलबजावणी अत्यंत निर्दयीपणे करण्यात आली. ज्यावेळी ही घटना घडली, तेव्हा मुलाची आई घरात नव्हती आणि नराधम नरसिमलू हा दारूच्या नशेत धुंद होऊन तिथे पोहोचला होता. घरात आपला बळी घेणारा राक्षस आला आहे, याची पुसटशी कल्पनाही त्या निरागस मुलाला नव्हती. नरसिमलूने सुरुवातीला त्या निष्पाप मुलाच्या डोळ्यांत तिखट टाकले, ज्यामुळे तो वेदनेने विव्हळू लागला. डोळ्यांची आग होत असताना आणि मदतीसाठी आक्रोश करत असतानाही नरसिमलूला त्याची दया आली नाही. जेव्हा मुलगा वेदनेने हतबल झाला, तेव्हा आरोपीने लाकडी दांडक्याने त्याच्या डोक्यावर सपासप वार केले. या भीषण हल्ल्यात त्या पाच वर्षांच्या कोवळ्या मुलाचा जागीच अंत झाला आणि एका निष्पाप आयुष्याचा अत्यंत दुर्दैवी अंत झाला.

या हत्याकांडाची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी तातडीने घटनास्थळ गाठून तपास सुरू केला. टाऊन सर्कल इन्स्पेक्टर नरहरी यांच्या नेतृत्वाखालील पथकाने तपासाची चक्रे फिरवली असता, सुरुवातीलाच त्यांना मुलाच्या आईच्या आणि नरसिमलूच्या वागण्यावर संशय आला. पोलिसांनी या दोघांनाही ताब्यात घेऊन त्यांची कडक चौकशी केली असता, त्यांनी आपला गुन्हा कबूल केला आणि संपूर्ण सत्य बाहेर आले. आपल्याच मुलाला वाटेचा काटा समजून संपवणाऱ्या या मातेच्या कृत्याबद्दल सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे. पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली असून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली जात आहे. एक आई आपल्या मुलाशी इतकी निष्ठुर कशी वागू शकते, असा प्रश्न आता विचारला जात असून या घटनेने सर्वांच्याच डोळ्यांत पाणी आणले आहे.




पोलीस तपासातून समोर आलेल्या माहितीनुसार, आरोपी नरसिमलू हा गेल्या सहा महिन्यांपासून संबंधित महिलेसोबत लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहत होता. ही महिला आपल्या पतीपासून वेगळी राहत असून तिला आठ वर्षांची मुलगी आणि पाच वर्षांचा मुलगा अशी दोन मुले होती. मात्र, आपल्या या नवीन नात्यामध्ये पाच वर्षांचा मुलगा हा एक मोठा अडथळा ठरू शकतो, असे त्या महिलेला सतत वाटत होते. त्यातच तो मुलगा मानसिकदृष्ट्या काहीसा कमकुवत होता, हीच बाब आरोपी नरसिमलू आणि त्या आईच्या डोळ्यात खुपत होती. आपल्या अनैतिक संबंधांची वाट सुकर करण्यासाठी आणि मुलाची जबाबदारी झटकण्यासाठी या दोघांनीही त्या निरागस बालकाला कायमचे वाटेतून हटवण्याचा भयानक कट रचला, ज्याची परिणती एका भीषण हत्याकांडांत झाली.

## तरुणीसोबत वृद्ध नेत्याचा आक्षेपार्ह व्हिडीओ व्हायरल झाल्याने खळबळ... काँग्रेस-भाजपमध्ये चांगलीच जुंपली

**■सातारा। प्रतिनिधी,**

मध्य प्रदेशातील रीवा जिल्ह्यातून एक अत्यंत संवेदनशील आणि धक्कादायक प्रकरण समोर आले असून, एका स्थानिक नेत्याचा कथित आक्षेपार्ह व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून राजकीय वतुर्ळात उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे. हा व्हिडिओ माजी जनपद उपाध्यक्ष विनोद मिश्रा यांच्याशी संबंधित असू शकतो, अशी चर्चा स्थानिक स्तरावर रंगली आहे. मात्र, अद्याप जिल्हा प्रशासन किंवा कोणत्याही संबंधित पक्षाकडून या माहितीला अधिकृतपणे दुजोरा देण्यात आलेला नाही. व्हिडिओ सार्वजनिक झाल्यापासून या प्रकरणाला विविध पैलू प्राप्त झाले असून, यामागे मोठे षडयंत्र असल्याची शक्यता नाकारता येत नाही.



**हनीट्रॅपचा संशय आणि युवतीच्या सोशल मीडिया पोस्टचे कनेक्शन**

व्हायरल होत असलेल्या या व्हिडिओमध्ये एक नेता आणि एक युवती संशयास्पद स्थितीत दिसून येत आहेत, ज्यामुळे हे संपूर्ण प्रकरण 'हनीट्रॅप' असण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. व्हिडिओमध्ये दिसणारी युवती वयाने खूपच लहान असल्याचे प्रथमदर्शनी जाणवत असल्याने या प्रकरणाचे गांभीर्य अधिकच वाढले आहे. स्थानिक सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित युवती पूर्वी मऊगंज क्षेत्रात एक कॅफे चालवत होती आणि तिथेच तिची ओळख या नेत्याशी झाली होती. विशेष म्हणजे, या व्हिडिओशी संबंधित एक स्क्रीनशॉट कथितपणे युवतीच्या इंस्टाग्राम अकाउंटवर संगीतासह शेअर करण्यात आला होता, ज्यामुळे यामागे काही नियोजित कट असावा असा संशय बळावला आहे. या घटनेनंतर संबंधित नेत्याने आपला फोन बंद केला असून, त्यांची अधिकृत बाजू अद्याप समोर येऊ शकलेली नाही.

**भाजप-काँग्रेसमध्ये जुंपली; राजकीय षडयंत्राचे एकमेकांवर आरोप**

या व्हिडिओच्या प्रसारानंतर रीवाच्या राजकारणात आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या जात आहेत आणि राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. भाजप आमदार प्रदीप पटेल यांनी या प्रकरणावर भाष्य करताना दावा केला आहे की, व्हिडिओमध्ये दिसणारी व्यक्ती काँग्रेस पक्षाशी संबंधित आहे. दुसरीकडे, काँग्रेस प्रवक्त्यांनी हे आरोप पूर्णपणे फेटाळून लावत पलटवार केला आहे की, संबंधित व्यक्ती भाजपच्या अतिशय जवळची आहे. दोन्ही प्रमुख राजकीय पक्ष आता एकमेकांवर चारित्र्यहनन आणि राजकीय सूडबुद्धीने कट रचल्याचे आरोप करत आहेत. या राजकीय कलगीतुऱ्यामुळे मूळ प्रकरणाचा तपास बाजूला राहून वेगळीच लढाई सुरू झाल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.

या प्रकरणातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे, अद्याप पोलीस किंवा जिल्हा प्रशासनाकडून कोणतीही एफआयआर दाखल करण्यात आलेली नाही किंवा कोणतेही अधिकृत निवेदन प्रसिद्ध करण्यात आलेले नाही. संबंधित नेत्याचं मौन आणि युवतीच्या सोशल मीडियावरील पोस्टमुळे हे प्रकरण अधिकच गुंतागुंतीचे बनले आहे. युवतीच्या सोशल मीडिया अकाउंटवर अनेक वैयक्तिक व्हिडिओ आणि ब्लॉग आधीपासूनच उपलब्ध आहेत, ज्यांचा आता या प्रकरणाशी संबंध जोडला जात आहे. आता पोलीस या प्रकरणात स्वतःहून हस्तक्षेप करून चौकशी करतात का आणि या कथित 'हनीट्रॅप'मागील सत्य काय आहे, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. तोपर्यंत रीवा जिल्ह्यात या व्हायरल व्हिडिओवरून सुरू असलेला गदारोळ थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत.

## तलाकच्या बैठकीनंतर भयंकर हाणामारी, भररस्त्यात चाकू, दगडाने हल्ला

### जीव वाचवण्यासाठी रक्ताच्या थारोळ्यात थेट पोलीस स्टेशनात

**■कल्याण। प्रतिनिधी,**

कल्याणमध्ये कौटुंबिक वादातून रक्ताची नाती एकमेकांच्या जिवावर उठल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. वालधुनी येथील अशोक नगर परिसरात एका महिलेवर आणि तिच्या भावावर पती, सासरा, दीर आणि नणंदेने मिळून जीवघेणा हल्ला केला. विशेष म्हणजे, घरात सुरू झालेला हा राडा पोलीस ठाण्याच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचला. तक्रार देण्यासाठी गेलेल्या बहीण-भावावर भररस्त्यात चाकू आणि दगडाने वार करण्यात आले. या हल्ल्यात दोघेही गंभीर जखमी झाले असून, आरोपी पती हा सराईत गुन्हेगार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. महात्मा फुले पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून मुख्य आरोपीला अटक करण्यात आली आहे.

कल्याण वालधुनीतील अशोक नगर परिसरात राहणाऱ्या रुक्सार नावाच्या महिलेचा विवाह 8 वर्षांपूर्वी तन्वीर फरीद खान याच्याशी झाला होता. मात्र, लग्नानंतर काही काळातच पती तन्वीर, दीर सद्दाम, सासरा फरीद आणि नणंद शबाना यांनी तिचा शारीरिक व मानसिक छळ सुरू केला. या त्रासाला कंटाळून रुक्सारने यापूर्वी आत्महत्येचाही प्रयत्न केला होता.

**तलाकच्या बैठकीत वाद**

12 एप्रिल 2026 रोजी या वादावर पडदा टाकण्यासाठी आणि तलाक संदर्भात चर्चा करण्यासाठी एक बैठक आयोजित करण्यात आली होती. मात्र, या बैठकीत पुन्हा वाद उफाळून आला. आरोपींनी रुक्सारला मारहाण आणि शिवीगाळ केली. यानंतर दोन्ही बाजूचे लोक तक्रार देण्यासाठी महात्मा फुले पोलीस ठाण्याकडे निघाले.

**पोलीस ठाण्याबाहेर थरार**

रुक्सार आणि तिचा भाऊ अस्लम हे पोलीस ठाण्याजवळ पोहोचले असताना, आरोपींनी त्यांच्यावर भररस्त्यात चाकू आणि दगडाने हल्ला केला. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. रक्ताच्या थारोळ्यात असलेले बहिण-भाऊ स्वतःचा जीव वाचवण्यासाठी धावत पोलीस ठाण्यात शिरले. आरोपी त्यांचा पाठलाग करत पोलीस ठाण्याच्या आवारापर्यंत आले होते.

**जखमींची प्रकृती चिंताजनक**

या हल्ल्यात अस्लम आणि रुक्सार यांना गंभीर दुखापत झाली असून त्यांना तातडीने मीरा रुग्णालयात दाखल करण्यात आले. दोघांनाही शरीरावर 8 ते 10 टाके पडले असून अस्लमची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.

**पोलिसांची कारवाई**

महात्मा फुले पोलिसांनी तत्परता दाखवत मुख्य आरोपी पती तन्वीर खान याला बेड्या ठोकल्या आहेत. तन्वीर हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वी हद्दपारीची कारवाईही करण्यात आली होती. सध्या सासरा आणि दीर फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

## चोरुन काढला दीर अन् वहिनीचा आक्षेपार्ह व्हिडिओ

### नंतर गावातील दोघांची 'ती' मागणी

**■मुंबई। प्रतिनिधी,**

एका महिलेला तिच्या आक्षेपार्ह व्हिडिओच्या माध्यमातून ब्लॅकमेल करून दोन लाख रुपये उकळल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी गावातीलच दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू केला आहे. पीडितेचा नवरा ट्रक ड्रायव्हर असून तो कामाच्या निमित्ताने अनेकदा घराबाहेर असतो, याचाच फायदा घेत आरोपींनी हे कृत्य केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. उत्तर प्रदेशातील मथुरा परिसरातील ही घटना आहे.

**दीरासोबतचा आक्षेपार्ह व्हिडिओ**

पीडितेने दिलेल्या तक्रारीनुसार, 28 फेब्रुवारी रोजी गावातील सद्दाम आणि इमरान नावाचे दोन तरुण तिच्या घरी आले. त्यांनी तिला मोबाईलवर तिचा आणि तिच्या दीराचा एक आक्षेपार्ह अवस्थेतील व्हिडिओ दाखवला. घराच्या मागील बाजूस असलेल्या खिडकीतून त्यांनी हा व्हिडिओ चोरून बनवल्याचा दावा आरोपींनी केला. हा व्हिडिओ संपूर्ण गावात व्हायरल करण्याची धमकी देत त्यांनी महिलेकडे दोन लाख रुपयांची मागणी केली. बदनामीच्या भीतीने पीडितेने घर बांधण्यासाठी साठवून ठेवलेले दोन लाख रुपये आरोपींच्या स्वाधीन केले.

**व्हिडिओ डिलीट केला नाही**

पैसे घेतल्यानंतर व्हिडिओ डिलीट करण्याची विनंती पीडितेने केली होती, मात्र आरोपींनी तसे केले नाही. 10 मार्च रोजी आरोपींनी पुन्हा पीडितेच्या घरात घुसून आणखी एक लाख रुपयांची मागणी केली. पैसे नसल्याचे सांगितल्यावर त्यांनी तिच्या अंगावरील सोन्याची चेन आणि चांदीची कुंडले देण्याची जबरदस्ती केली. पीडितेने प्रतिकार केला असता झालेल्या गोंधळामुळे घरातील इतर सदस्य तिथे पोहोचले. नातेवाईकांना पाहून आरोपींनी शिवीगाळ करत आणि ठार मारण्याची धमकी देत तिथून पळ काढला.

**अखेर पोलीसात धाव**

नवरा घरी परतल्यानंतर पीडितेने हा सर्व प्रकार सांगितला. सुरुवातीला बदनामी टाळण्यासाठी पतीने सामोपचाराने हे प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न केला, मात्र आरोपी जुमानत नसल्याने अखेर पोलिसांत धाव घेण्यात आली. शेरगड पोलीस ठाण्याचे प्रभारी अजय किशोर यांनी सांगितले की, पीडितेच्या अर्जावरून गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींचा शोध घेण्यासाठी पथके तैनात करण्यात आली आहेत. या घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## गर्लफ्रेंडचं लग्न ठरलं, नाराज प्रियकराने होणाऱ्या नवऱ्याला पाठवले प्रायव्हेट फोटो... पुढे काय घडलं?

**सूडबुद्धीने केलेली डिजिटल बदनामी आणि लग्नाचा बनाव**

जयश्रीचे यापूर्वी श्रीशैल बदनूर नावाच्या एका तरुणासोबत प्रेमसंबंध होते. जेव्हा श्रीशैलला समजले की जयश्रीचे लग्न दुसरीकडे ठरले आहे, तेव्हा त्याला ही बाब सहन झाली नाही. तिला समजावून सांगण्याऐवजी किंवा तिचा आनंद स्वीकारण्याऐवजी त्याने तिला समाजात बदनाम करण्याचा नीच मार्ग निवडला. श्रीशैलने जयश्रीसोबतचे काही खाजगी फोटो ज्या तरुणाशी तिचे लग्न होणार होते, त्याच्या कुटुंबाला पाठवले. हे फोटो सासरच्या मंडळींच्या हाती पडताच त्यांनी कोणताही विचार न करता तात्काळ हे लग्न मोडण्याचा निर्णय घेतला. लग्नाचे ठरलेले नाते अशा प्रकारे तुटल्यामुळे जयश्रीला मोठा सामाजिक आणि मानसिक धक्का बसला. यामुळे ती पूर्णपणे खचून गेली होती.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

प्रेमाचे रूपांतर जेव्हा विकृत मानसिकतेत होते, तेव्हा ते केवळ नातेच संपवत नाही तर एखाद्याचा जीव घेण्यासही कारणीभूत ठरते. कर्नाटकात एका सनकी प्रियकराच्या सूडबुद्धीमुळे एका 22 वर्षीय तरुणीला आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलावे लागले आहे. जयश्री बिरादर असे या दुर्दैवी तरुणीचे नाव असून, तिच्या लग्नाची सर्व तयारी घरात सुरू होती. तिच्या लग्नाचा शुभमुहूर्त आगामी 27 एप्रिल रोजी निश्चित करण्यात आला होता आणि साखरपुड्याचे सर्व विधी देखील आनंदाने पार पडले होते. मात्र, जयश्रीच्या आयुष्यातील एका जुन्या प्रकरणाने या आनंदाच्या वातावरणाचे रूपांतर दुःखात केले. ही हृदयद्रावक घटना कर्नाटकच्या विजयपुरा जिल्ह्यातील सिंदगी तालुक्यातील बंदल गावात घडली आहे.

**अपमानाच्या ओझ्याखाली विहिरीत उडी घेऊन आत्महत्या**

लग्नाचे नाते तुटल्यामुळे झालेला अपमान आणि सामाजिक बदनामीचे ओझे जयश्रीला सहन झाले नाही. या मानसिक त्रासामधून बाहेर पडणे तिला कठीण झाले आणि अखेर तिने टोकाचे पाऊल उचलण्याचे ठरवले. काल संध्याकाळच्या सुमारास जयश्रीने गावातील मदिना मशिदीजवळ असलेल्या एका विहिरीमध्ये उडी घेतली. ही बाब गावकऱ्यांच्या लक्षात येताच त्यांनी तिला वाचवण्यासाठी घटनास्थळी धाव घेतली, परंतु दुर्दैवाने तोपर्यंत तिचा मृत्यू झाला होता. तिच्या मृत्यूची बातमी समजताच संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे. जयश्रीच्या कुटुंबातील सदस्यांचा आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा असून त्यांनी या सर्व प्रकाराला जबाबदार असलेल्या श्रीशैल विरुद्ध कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

घटनेची माहिती मिळताच सिंदगी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह ताब्यात घेतला आणि तो उत्तरीय तपासणीसाठी पाठवून दिला. सिंदगी पोलिसांनी या प्रकरणी तपास करून दिलेल्या माहितीनुसार, आरोपी श्रीशैल बदनूर याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके रवाना झाली आहेत. डिजिटल डेटा आणि सोशल मीडियाचा वापर एखाद्याचे आयुष्य उद्ध्वस्त करण्यासाठी कसा केला जाऊ शकतो, याचे हे एक भीषण उदाहरण ठरले आहे. सध्या पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत असून फरार असलेल्या आरोपीला पकडण्यासाठी ठिकठिकाणी छापेमारी केली जात आहे. या घटनेने नात्यांमधील विश्वास आणि डिजिटल सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा गंभीरपणे समोर आणला आहे.

या प्रकरणात पोलिसांकडून तपासाची माहिती देण्यात आली असून आरोपीला लवकरच बेड्या ठोकल्या जातील असे सांगण्यात आले आहे.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com